# ांचे - शहाणपण



वा. गो. आपटे

IRBK-0102958


आनंद कार्यालय प्रकाशन

# मुलांचें शहाणपण

( कौंट लिओ टॉलस्टॉय यांच्या संवादाचा अनुवाद )

आवृत्ति दुसरी–१९४९

अनुक्रम ९६५
विभाग
क्रमांक
नों. दि.



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बा. क्र. ... नों. दि ...
वि. ... क्र. ...

ात १२ आणे

पटे, बी. ए.

IRBK-0102958

IRBK-0102958

# नवीं मनोरंजक पुस्तकें

## दोन तीन रंगी मुखपृष्ठें, भरपूर चित्रें

| | | किंमत |
|---|---|---|
| सात राजहंस | ... | ०८ |
| लिंबोणीच्या झाडाखालीं | ... | ०१२ |
| स्वर्गावर स्वारी | ... | ०१२ |
| रुपेरी मनोरा | ... | ०६ |
| चंद्रशेखर आणि मोहना | ... | ०६ |
| साधुसंतांच्या गोष्टी | ... | ०१२ |
| रामायणांतल्या सोप्या गोष्टी | ... | ०१२ |
| मुलांचें शहाणपण | ... | ०१२ |
| परिस्तानांतल्या गोष्टी | ... | ०१२ |
| थोर विभूति | ... | ०१२ |

प्रकाशक
गो. ब. जोशी
आनंदकार्यालय,
३३० सदाशिव, पुणें २.

मुद्रक
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय,
११६।४६ सदाशिव, पुणें २.

# प्रस्तावना

अर्वाचीन काळांतले सुप्रसिद्ध रशियन साधु महात्मा कौंट टॉलस्टॉय यांचें नांव महाराष्ट्रीयांस अपरिचित नाहीं. मुंबईच्या 'भारतगौरव ग्रंथमाले' त पांच खंडांत प्रसिद्ध झालेलें त्यांचें चरित्र हजारों महाराष्ट्रीयांनीं वाचलेलें आहे. त्यावरून आणि महात्मा गांधी यांच्या मतांसंबंधानें लिहितांना वर्तमानपत्राच्या संपादकांनीं या दोघा महात्म्यांच्या मतांत अनेक वेळां दाखविलेल्या सादृश्यावरून टॉलस्टॉय यांच्या मतांच्या अपूर्वत्वाविषयींचीहि बरीचशी कल्पना महाराष्ट्रीय वाचकांस झालेली आहे. कौंट टॉलस्टॉय यांच्यासारख्या ८० वर्षांच्या वरच्या वयाच्या अनुभविक लेखकानें मरणाच्या अगोदर दोनच वर्षें मनुष्यजीवन व समाजव्यवस्था यांच्यांतले दोष एखाद्या अज्ञ माणसालाहि सहज कळावे इतक्या सुगम रीतीनें कांहीं संवादांची रचना करून ते लिहून काढले होते व कांहींचीं टांचणें करून ठेविलीं होतीं. हे संवाद अगदीं लहान लहान असले तरी त्यांत लेखकाची प्रतिभा स्पष्टपणें दिसून येते. निष्कपट व पवित्र मन, परोपकारबुद्धि, सरळ व चौकस स्वभाव, त्याचप्रमाणें स्वार्थबुद्धि, परंपरागत रूढी, सत्तेची मदांधता, जनहिताविषयींची बेपर्वाई, व स्वतःच्या शहाणपणाविषयींचा रिकामा डौल इत्यादि अनेक पडद्यांच्या आड लपून राहिलेलें सत्य हुडकून काढण्याचें कौशल्य हे गुण परमेश्वरानें मुलांच्या ठायीं कसे उपजतच ठेविले आहेत, व त्यामुळें वर्डस्वर्थ व टागोर यांच्यासारख्या जगन्मान्य कवींनीं मुलांना देवदूत म्हटलें आहे तें किती सत्य आहे याची चांगली कल्पना या छोट्या संवादांच्या वाचनानें करून घेतां येते, आणि 'बालादपि सुभाषितं ग्राह्यम्' अशी वृत्ति माणसानें ठेविल्यास त्याला आपल्या व समाजाच्या उन्नतीचा मार्ग दिसूं लागतो. यांतच या संवादांचें खरें महत्त्व आहे. सारांश, लहान

आकृति पण महत्कार्यकर्ती प्रकृति असें या संवादांचें स्वरूप थोडक्यांत सांगतां येईल.

प्रत्येक संवादांत व्यक्ति किंवा समाज यांच्या संबंधाचें एखादें अनुभवसिद्ध तत्त्व लेखकानें अशा रीतीनें गोंविलें आहे कीं तें अज्ञ माणसालाहि सहज ओळखतां येईल. उदाहरणार्थ—दिवसभर काबाडकष्ट करून सुद्धां पुष्कळ माणसांना पोटभर भाकरी आणि राहण्याला निवाऱ्याची जागा मिळत नाहीं. उलट, कांहीं काम न करतां आळसांत गादीवर लोळणाऱ्या 'बडे बापके बेटयां' जवळ इतकी संपत्ति जमा झाली असते कीं तिचें काय करावें तें त्यांना कळत नाहीं. धनाच्या वांटणीसंबंधानें अशी विषमता ज्या समाजांत दिसून येते, त्या समाजाची उभारणीच चुकीच्या पायावर झाली आहे असें समजण्यास हरकत नाहीं. हें तत्त्व 'मिळकत' या संवादाच्या द्वारें स्थापित करण्यांत आलें आहे. दिवाणी आणि फौजदारी कोर्टांतून चालू असलेल्या न्यायदानाच्या पद्धतीचा सदोषपणा, त्याचप्रमाणें गुन्हेगारांना शिक्षा देण्याचा अधिकार प्रत्येक बाबतींत स्खलनशील अशा माणसावर सोंपविणें समाजाला किती हानिकारक होतें, व तो अधिकार सर्वज्ञ अशा परमेश्वराच्याच हातीं ठेवणें कसें रास्त आहे, प्रत्येक राष्ट्र स्वतंत्र असावें अशी खरोखर परमेश्वराची योजना असतां कांहीं राष्ट्रें परमेश्वराची इच्छा बाजूला सारून असुरी लालसेनें दुसऱ्या राष्ट्रावर कशीं अन्यायानें आक्रमण करतात, खून केलेल्या अपराध्याला फांशीची शिक्षा दिल्यानें त्या अपराध्याची सुधारणा न होतां समाजाची मात्र एक प्रकारें कशी हानि होते, त्यापेक्षां त्याला माफी देऊन व प्रेमानें वश करून घेऊन त्याच्यांत सुधारणा घडवून आणणें कसें शतपटीनें इष्ट आहे, मुलांच्या शिक्षणक्रमांत निरुपयोगी व अनवश्यक विषय निष्कारण घातल्यानें मुलें शिकण्यास कशीं कंटाळतात व विद्यापराङ्मुख होतात, देशांत जीं भाराभर वर्तमानपत्रें व मासिकें हल्लीं निघत आहेत त्यांच्यापासून समाजाला खरा उपयोग कितीसा होतो, आणि माणसाच्या मनांत भ्रम उत्पन्न करण्याचें व एखाद्या

विषयाचें सत्य स्वरूप विकृत करून दाखविण्याचें काम पुष्कळसे लेखक कसे करीत असतात, वगैरे गोष्टींवर या संवादांमुळें चांगला प्रकाश पडेल. मोठ्या माणसांना सुचणार नाहींत असे मार्मिक प्रश्न करून मुलें सत्याविष्कारण करतात, म्हणूनच थोर व विचारी लेखक द्रष्टे, दिव्य संदेश सांगणारे, सत्याविष्करण करणारे, इ. उपपदांनीं मुलांचा गौरव करतात, आणि त्यांच्या प्रश्नांची हेटाळणी न करतां त्यांतलें सत्य आस्थेनें व निरभिमानतेनें ग्रहण करतात. अशाच दृष्टीनें या संवादांकडे पाहिलें पाहिजे, म्हणजे त्यांचें खरें मोल किती आहे तें कळून येईल.


कौंट टॉलस्टॉय हे रशियन होते. अर्थात् त्यांच्या वेळच्या रशियाच्या परिस्थितीच्या धोरणानें त्यांनीं हे संवाद लिहिले आहेत. हिंदुस्थानची परिस्थिति थोडीशी भिन्न असल्यामुळें आपल्या प्रस्तुत परिस्थितीला जुळणारे असे कांहीं फेरफार करणें अवश्य होतें व ते टॉलस्टॉय यांच्या पुस्तकाचें ‘ हमने ए नहि समजाय ’ या नांवाचें गुजराथींत भाषांतर करतांना श्रीयुत मनुभाई कल्याणजी देसाई बी. ए. यांनीं बराच मार्मिकपणा दाखविला आहे. सदर गुजराथी पुस्तकाचें हें मराठी भाषांतर करतांना नुसतीं नांवें बदलण्यापलीकडे मला फारसें कांहीं करावें लागलें नाहीं. श्री. देसाई यांनीं आपल्या गुजराथी पुस्तकाचें मराठी भाषांतर करण्यास आनंदानें मला परवानगी दिली; इतकेंच नाहीं, तर माझें हें मराठी भाषांतर वाचून अतिशय समाधान व्यक्त केलें व कांहीं उपयुक्त सूचनाहि केल्या, याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों, आणि महाराष्ट्रांतल्या आबालवृद्धांनीं हे संवाद वाचून त्यावर मनन करावें या हेतूनें प्रस्तुत पुस्तक त्यांच्या हातीं मोठ्या प्रेमानें देतों.

आनंदकार्यालय, पुणें.
आषाढ व. १३ शके १८४९ } वा. गो. आपटे

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ मिळकत | १ |
| २ धन | ४ |
| ३ अंगमेहनत | ८ |
| ४ स्वदेश | १० |
| ५ युद्ध | १२ |
| ६ दिवाणी कोर्ट | १४ |
| ७ फौजदारी कायदा | १७ |
| ८ कैद | १८ |
| ९ फाशीची शिक्षा | २२ |
| १० वसूल | २६ |
| ११ कैफ ( अंमल ) | २९ |
| १२ दया | ३२ |
| १३ प्रेम-धर्म | ३४ |
| १४ पश्चात्ताप | ३६ |
| १५ कटु भाषण | ३९ |
| १६ धर्म | ४१ |
| १७ शिक्षण | ४३ |
| १८ वर्तमानपत्र | ४९ |
| १९ कला | ५३ |
| २० विज्ञान् | ५७ |
| २१ मुलें | ६० |

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.



# मिळकत

[ रामजी सुतार सज्ज्याच्या कठड्याची दुरुस्ती करीत आहे. घराचे मालक जनार्दनपंत यांचा ७ वर्षांचा मुलगा मधुकर उभा राहून तें पाहत आहे. ]

**मधु०** ( मनाशी )—किती छानदार काम करीत आहे हा ! ( उघड ) सुतारबाबा ! तुमचें नांव काय ?

**सुतार**—रामजी.

**मधु०**—रामजी ? वा: ! तुम्ही किती छान कठडे करतां !

**सुतार**—काम चांगलेंच करायला हवें, नको का ? वाईट काम काय म्हणून करावें ?

**मधु०**—तुमच्या घराला असा सज्जा आहे. नाहीं ?

**सुतार**—तें काय विचारतां ! आमच्या घराचा सज्जा इतका छानदार आहे कीं त्याच्यापुढें एखाद्या राजवाड्याचा सुद्धां सज्जा झक मारील ! पण आमच्या सज्ज्याला असला कठडा नाहीं बरें का ! आमच्या सज्ज्यांत पाऊल टाकण्याचा अवकाश कीं एकदम कडाड्दिशीं आवाज होऊन तो धप्पदिशीं खालींच कोसळावयाचा !

मधु०—हें तुम्ही उगाच कांहींतरी सांगतां झालें. माझी थट्टा करतां वाटते ? खरें सांगा ना ? तुमच्या घराला असा सज्जा आहे ?

सुतार—कोठून असणार, छोटे साहेब ? अहो, डोक्यावर छाया करण्यापुरतें खोपटें देवानें दिलें आहे हेच त्याचे मोठे उपकार म्हणायचे ! घराचें छप्पर मोडलें आहे तें नीट करायचें म्हणून आज किती दिवस म्हणतों आहें; पण तेवढें सुद्धां माझ्या हातून अजून घडत नाहीं ?

मधु०—कां वरें ? कां घडत नाहीं ? तुम्ही लोकांचीं कामें करून देतां, आणि स्वतःचें काम तुमच्यानें करवत नाहीं ?

सुतार—हो. असें आहे खरें. मी लोकांचीं कामें करून देतों, पण स्वतःचें काम करायला मला बनत नाहीं.

मधु०—पण असें कां ?

सुतार—तें तुम्हांला आतांच कळणार नाहीं. मोठे झालांत म्हणजे कळेल. मी लोकांचीं हवी तेवढीं कामें करून देईन. स्वतःचें काम मात्र माझ्या हातून व्हायचें नाहीं.

मधु०—पण असें का ?

सुतार—कां म्हणून काय विचारतां ? छप्पर बांधायचें म्हणजे वासे नकोत का ? ते विकत आणायचे म्हणजे पैसे पाहिजेत. माझ्या जवळ कोठें आहेत पैसे ? माझ्याजवळ पैसे नाहींत म्हणून तर मी तुमच्यासारख्या बड्या लोकांच्या दाराशीं कामाला येतों. छोटे साहेब, तुम्ही रावसाहेबांना सांगून माझी मजुरी वाढविलीत,

तर मी त्या पैशानें बाजारांतून लाकडें आणून घराचें छप्पर नीट-नेटकें करीन.

मधु०—पण तुमचें एखादें शेतवीत नाहीं काय ? आम्ही तर जंगलांतून किंवा आमच्या शेतांतून लांकडें आणवितों.

सुतार—तुमचें ठीक आहे. पण आम्हां गरिबांजवळ जंगल किंवा शेत कोठून असणार ?

मधु०—काय म्हणतां ? तुमचें एकहि शेत नाहीं ? आमची तर इतकी शेतवाडी आहे कीं बाबांना तिची देखरेख करतां करतां पुरेवाट होते, आणि ते अगदीं कंटाळून जातात.


सुतार—हींच तर गंमत आहे ! तुमच्याजवळ पुष्कळ जमीन-जुमला आहे म्हणून तुम्ही दुःखी, आणि माझा म्हणायला जमिनीचा लहानसा सुद्धां तुकडा माझ्याजवळ नाहीं म्हणून मी दुःखी ! पण आतां बोलून माझा वेळ घेऊं नका. मला माझें काम करूं द्या. नाहींतर रावसाहेब आले म्हणजे माझी खरड काढतील.

(सुतार आपलें काम करतो. मधुकर क्षणभर विचार करित राहतो. नंतर—)


मधु०—मी मोठा झाल्यावर किनई, रामजी, माझी जमीन आपण वांटून घेऊं. सर्वांना अगदीं सारखे वांटे करून देऊं, बरं का !

सुतार—असें का ? तर मग लवकर मोठे व्हा. नाहीं तर....अरे पण माझा वासला मी कोठें टाकला !........

ठाणे
क्र. २८५८



# धन



[ सर ब्रिजमोहनदास आणि त्यांची स्त्री विमलाबाई बंगल्याच्या ओसरींत खुर्च्या टाकून बसलीं आहेत. त्यांचा सहा वर्षांचा मुलगा कांत जवळ खेळत आहे. इतक्यांत रस्त्यानें जाणारा एक भिकारी त्यांना पाहून जवळ येतो. ]

**सर ब्रिज०**— ( भिकाऱ्याला )—काय म्हणतोस ?

**भिकारी**—शेठ ! मी भुकेनें मरतो आहे. गरीबावर कांहीं दया करा.

**सर ब्रिज०**—पण तूं गरीब कशाला झालास ?

**भिकारी**—काय करूं शेठ ? तें काय माझ्या हातचें आहे ?

**सर ब्रिज०**—हातचें कां नाहीं ? मेहनत करावी, मजुरी करावी, तेव्हां पैसा मिळतो. तूं चांगला धट्टाकट्टा आहेस. मजुरी करायला काय झालें तुला ? भीक कशाला मागतोस ?

**भिकारी**—शेठ ! मजुरी करायला मी तयार आहें. पण काम मिळतें आहे कुठें ?

**सर ब्रिज०**—दुसऱ्या लोकांना मिळतें, अन् तुलाच कसें मिळत नाहीं ?

**भिकारी**—शेठ ! खरें खरें सांगतों. काम करायला मी तयार

मुलांचें

आहे. पण कोणी कामच देत नाहीं. शेठ ! गरीबावर दया करा. मी दोन दिवसांचा उपाशी आहे.

( पोट दाखवितो )

**सर ब्रिज॰** ( खिशांत हात घालतात. थोड्या वेळानें स्त्रीस )— माझ्या खिशांत सुट्टा पैसा नाहीं. तुझ्या जवळ असला तर दे.

**विमला**—( मुलाला )—कांत ! घरांतल्या टेबलावर पैसा पडला आहे, तो आण पाहूं ?

( कांत भिकाऱ्याकडे जिज्ञासेनें पाहत राहतो. त्याचें विमलेच्या भाषणाकडे लक्षच नाहीं. म्हणून मोठ्यानें ओरडून— )

**विमला**—कांत ! ऐकूं आलें का तुला मीं काय म्हटलें तें ?

( त्याचा हात धरून ओढते. )

**कांत**—काय आई ? काय म्हणतेस ?

**विमला**—घरांतल्या टेबलावरचा पैसा आण.

**कांत**—आत्तां आणतों पहा.

( जातां जातां भिकाऱ्याकडे पाहतो. )

**सर ब्रिज॰**—( भिकाऱ्याला ) जा, जरा बाजूला उभा राहा. आतां आणून देईल.

( भिकारी जरा दूर जाऊन उभा राहतो. )

**सर ब्रिज॰**—( स्त्रीला ) या लोकांना काम करायला नको. उगाच लोकांना त्रास मात्र द्यायला हवा. भारीच बुवा आळशी लोक !

**विमला**—पण बिचारा दोन दिवसांचा उपाशी आहे !

सर ब्रिज०—अग, हें किनई सगळें खोटें !

[ इतक्यांत नोकर चहाचे पेले आणून दोघांना देतो. हें पाहून आपण उभे आहों याचें स्मरण देण्यासाठीं भिकारी खाकरतो. कांत पैसा आणून भिकाऱ्याला शोधतो. ]

**कांत**—आई ! हा आणिला पैसा. देऊं त्या भिकाऱ्याला ?

**सर ब्रिज०**—पाहूं ?

**कांत**—हा पहा. देऊं त्याला ?

**सर ब्रिज०**—दे. पण त्याला शिवूं नकोस हो. दुरून टाक.

**कांत**—ए भिकाऱ्या ! हा घे पैसा.

( पैसा टाकून त्याचेकडे पाहत राहतो. )

**भिकारी** ( हात वर करून )—देव तुमचें कल्याण करो !

**सर ब्रिज०**—तुम्ही लोक हाडाचेच हरामखोर आहां. तुम्हांला श्रम करायला नकोत. मेहनत करतो त्याला सर्व कांहीं मिळतें.

**भिकारी** ( जातां जातां )—खरें आहे, शेठ ! पहा भीक मागितल्यानेंच पैसा मिळाला. काम करण्यानें उलट हाडें मात्र दुखलीं असतीं. ( घाई घाईनें जातो. )

**कांत**—भिकारी काय म्हणाला ?

**सर ब्रिज०**—तो म्हणाला कीं मेहनत केल्यानें अंग दुखतें, पण पैसा मिळत नाहीं.

**कांत**—बाबा, त्याचें म्हणणें खोटें आहे का ?

**सर ब्रिज०**—खोटें नाहीं, तर काय खरें ? याच्यासारखे लोक

जे मेहनत न करतां रिकामे हिंडतात, ते सदा गरीबींतच रहावयाचे. पण अंगमेहनत करतात ते पैसेवाले होतात.

**कांत**---पण बाबा ! आपण कांहीं मेहनत करीत नाहीं, तरी पण आपल्याजवळ पुष्कळ पैसा आहे. हें कसें ?

**विमला**---( हसून ) पण आपण कांहीं मेहनत करीत नाहीं हें तूं कशावरून म्हणतोस ?

**कांत**---आपल्याजवळ पुष्कळ पैसा आहे, यावरून बाबांना फार मेहनत करावी लागत असली पाहिजे. नाहीं ?

**सर ब्रिज०**---अरे, कामाकामांत अंतर असतें. माझें काम दुसऱ्याला करतां यावयाचें नाहीं.

**कांत**---बाबा ! तुम्ही काय काम करतां ?

**सर ब्रिज०**---तें तुला आतांच कळणार नाहीं.

**कांत**---पण सांगा ना ?

**सर ब्रिज०**---तुला नवे कपडे करवून देतों, खायला प्यायला घालतों. लिहावाचायला शिकवितों. ( हंसतो. )

**कांत**---पण हा भिकारीसुद्धां त्याच्या पोराला खाऊं पिऊं घालीतच असेल. मग त्या बिचाऱ्याच्या वांट्याला गरीबी कां ? अन् आपण श्रीमंतींत ..........



# अंगमेहनत

[ जनार्दनपंत; रमा ( वय ८ वर्षे ) आणि मधुकर ( वय ७ वर्षे ). ]

**रमा**—बाबा ! आमची खेळांतली बैलगाडी मोडली आहे. तेवढी नीट करून द्या ना ?

**जना०**—मला ती कशी नीट करतां येईल ? बाहेर रामजी सुतार काम करतो आहे. तो देईल नीट करून.

**रमा**—पण तो तर मोठा दरवाजा घडवीत बसला आहे. मीं त्याला म्हटलें कीं माझी गाडी नीट करून दे. पण तो म्हणाला 'आतां नाहीं. मग या.'

**जना०**—तर मग थोडा वेळ थांब.

**मधु०**—पण बाबा ! तुम्हीच कां देत नाहीं ? तुम्हांला नाहीं ती नीट करतां येत ?

**जना०**—नाहीं. मला येत नाहीं.

**रमा**—सुताराला येतें, अन् तुम्हांला कां येत नाहीं ?

**जना०**—( हसून ) नाहीं. हें मला येत नाहीं.

**मधु०**—तर मग तुम्हांला कांहींच नाहीं का येत ?

**जना०**—दुसऱ्या पुष्कळ गोष्टी येतात; पण सुताराचें काम येत नाहीं. ज्याचें काम त्यालाच करतां येतें.



मुलांचें

मधु०—बरें ! तुम्हांला आपल्या गणपती गड्यासारखी झाडलोट, भांडीं घासणें, हीं कामें करतां येतात ?

जना०—नाहीं.

मधु०—घोड्याची चाकरी करतां येते ? गाडी हाकतां येते ?

जना०—नाहीं.

रमा—आपल्या गणपतीला किती तरी कामें करतां येतात ! अन् तुम्हांला कांहीं येत नाहीं. असें कां ?

जना०—ज्याचें जें काम असतें तें तो करतो. आपणाला कोणतें काम करावयाचें तें मोठेपणीं तुला कळेल.

रमा—झाडलोट, भांडीं घासणें, कपडे धुणें हीं कामें करायला आपणाला शिकायला नको तर ?

जना०—हीं हलकीं कामें आहेत. यापेक्षां जास्त मोठीं कामें आपणाला शिकावयाचीं असतात.

मधु०—हो. तें मला ठाऊक आहे. चांगले होणें, राग न धरणें, न भांडणें——

रमा—पण चांगलें होणें, राग न धरणें, वगैरे कामांबरोबरच झाडलोट करणें व भांडीं घासणें हीं कामें शिकतां येत नाहींत कां ?

मधु०—बाबा, येतात का हो ?

जना०—हो येतील. पण या गोष्टी आत्तांच तुला समजावयाच्या नाहींत. तूं मोठा होशील तेव्हां कळतील.

मधु—पण मी मोठा न झालों तर कशा कळतील ?

जना०—काय वेडा आहे पोरगा !

★

# स्वदेश

[ गंपू वय १५, बाबू वय १२, आणि सुंदर वय ८ हीं तीन मुलें भिंतीवर टांगलेल्या पृथ्वीच्या नकाशाकडे पाहत आपसांत बोलत आहेत. ]

गंपू०—बाबू, नकाशांत हे तांबडा रंग दिलेले सगळे देश इंग्रज लोकांचे बरें कां ?

बाबू—अबब ! हे सारे देश इंग्रजांचेच ? इंग्रजांना इतके देश घेऊन काय करायचें आहे ? त्यांचा इंग्लंड देश त्यांना आहे ना ?

गंपू—हो, पण या दुसऱ्या देशांवरहि इंग्रजांचेंच राज्य आहे.

सुंदर—हें सारें इंग्रजांचें राज्य, तर मग आपलें राज्य कोणतें ?

गंपू—आपलें राज्य ? आपणाला राज्य आहे कुठें ?

बाबू—कां बरें ? इंग्रजांचा देश जसा इंग्लंड आणि तेथें राज्य करणारे इंग्रज आहेत, तसा हिंदुस्थान हा आपला देश आहे, तेव्हां येथें आपलें राज्य असलें पाहिजे.

गंपू—असलें पाहिजे खरें. पण तें कुठें आहे ? आपल्या येथेंहि इंग्रज लोकच राज्य करतात.

बाबू—कां बरें ? त्यांना येथें राज्य करायला कोणीं सांगितलें ?

गंपू—सांगायला कशाला हवें ? त्यांनीं आपला देश जिंकून....

सुंदर—आपला देश म्हणजे काय ? आपण तो कोठून आणिला ?

पला देश म्हणजे आपण जेथें जन्मलों व आपले
राहत आले तो देश. देवानेंच तो आपणाला दिला.
ाला हवा ? इंग्रजांना इंग्लंड हा देश दिला, चिनी
ेश दिला, तसा आपणाला हिंदुस्थान देश देवानेंच
्याच लोकांना त्यांचा स्वतःचा म्हणून एकेक देश
वदेश म्हणतात. हिंदुस्थान हा आपला स्वदेश आहे.
णाला आवडो न आवडो, देवानें दिलेल्या देशाला
टलें पाहिजे कीं काय ?

ानें आपणाला आईबाप व भाऊ बहिणी दिल्या.
या तरी आपल्या म्हणून आपण त्यांच्यावर प्रेम
? तसेंच देशाचें समजावें व त्यावर प्रेम करावें.
ेवानें तरी निरनिराळ्या लोकांना निरनिराळे देश
मिळून एकच देश कां दिला नाहीं ?
डतील म्हणून.
ाटून दिल्यानें लोकांमधलीं भांडणें थांबलीं
ेवानें इंग्रजांना इंग्लंड हा देश दिला आहे
ापल्या या देशांत कां आले ? आणि येथें राज्य

? आपण खेळांत जसे दोन पक्ष गमतीनें
पक्ष दुसऱ्याला हरवून त्याचें राज्य घेतो,
लोकांना युद्धांत हरवून आपलें राज्य घेतलें.

अनुक्रम ३५४४/८२
विभाग
क्रं. ५८३
ग्रं. दि.

ते ?
डेल ?
साफ
ाय ?

इच्छा

ात. सर-


असें त्यांनीं

ं.
असतो ?
पहा साहेब

गंपू—बाबू, सुंदर ! तुम्ही लहान आहां. इंग्रजांनीं आपलें राज्य कां व कसें घेतलें हें तुम्हांला या वयांत कळणारं नाहीं. मोठे झाल्यावर तुम्हांला कळेल.

सुंदर—तर मग हें समजून घेण्यासाठीं मला लवकर मोठें झालें पाहिजे.

गंपू—( स्वतःशीं ) काय वेडी आहे ही पोर !



# युद्ध

[ रणधीर—शांततेच्या काळांत लष्करी अंमलदारांच्या घरचीं कामें करणारा शिपाई. बाबू—अंमलदाराचा मुलगा. ]

रणधीर—बाबू ! मी आतां जातों. देव करील तर पुनः आपल्या भेटी होतील.

बाबू—रणधीर ! तूं खरोखर चाललासच काय ?

रणधीर—हो. लढाई सुरू झाली आणि निघण्याचा हुकूम सुद्धां मिळाला. मग नको जायला ?

बाबू—लढाई ? कशासाठीं लढाई ? आणि कोणाकोणांत ?

रणधीर—देव जाणे ! मला कांहीं तें ठाऊक नाहीं. पण लोक म्हणतात कीं बेलज्यम आणि जर्मन यांच्यांत काय झालें कोण जाणे ! मला कांहीं त्यांतलें ठाऊक नाहीं.

बाबू—पण हे लोक भांडतात आणि लढाई करतात, त्यांत तूं कां म्हणून पडतोस ?

रण०—कां म्हणजे ? सरकार पाठवितें म्हणून.

बाबू—पण तुझी जाण्याची इच्छा आहे काय ?

रण०—कोणा लेकाची लढाईला जाण्याची इच्छा असते ? बायका-पोरांना घरीं ठेवून दूरदेशीं लढाईवर जाणें कोणाला आवडेल ?

बाबू—मग तूं कशाला जातोस ? मी नाहीं येत म्हणून साफ कां सांगत नाहींस ? असें सांगितलें तर चालणार नाहीं काय ? सरकार तुझें काय करील ?

रण०—काय करील ? जबरदस्तीनें ओढून नेईल.

बाबू—कोण ओढून नेतील ?

रण०—माणसेंच—तुमच्या आमच्यासारखीं माणसें.

बाबू—पण आपल्या सारखींच माणसें असल्यावर इच्छा नसतांना तीं कां ओढून नेतात ?

रण०—माणसेंच खरीं, पण बडेबडे अंमलदार असतात. सरकारचा हुकूम होतांच त्यांना जावें लागतें.

बाबू—पण आम्हांला असलें काम करायचें नाहीं असें त्यांनीं म्हटलें तर ?

रण०—असें सांगून चालत नाहीं.


बाबू—कां नाहीं चालत ?

रण०—कारण कीं असा सरकारचा नियमच आहे.

बाबू—कशाचा नियम ? असा कोठें नियम होत असतो ?

रण०—तें तुम्हांला आतां कळणार नाहीं. तो पहा साहेब आला. मी जातों.

★



# दिवाणी कोर्ट

[ शेतकरी, त्याची बायको, शेजारीण, आणि कृष्णा ( मुलगा ) वय ८ वर्षे. शेतकरी हुश्श हुश्श करीत कपाळावरचा घाम निपटून काढतो. ]

**शेजा०**—विचारे थकून गेले आहेत अगदीं !

**शेतकऱ्याची बायको**—कां नाहीं थकवा येणार ? पांचसात कोस चालून यायचें आणि उन्हाळा हा असा !

**शेत०**—पांचसात कां ? चांगला दहा कोस चालून आलों. ( मंगळ्यास ) बैलापुढें गवताची पेंढी टाक.

**शे० बा०**—अखेर आपल्या मुकद्दम्याचें काय झालें ?

**शेत०**—( उसासा टाकून ) आपण हरलों.

**शेजा०**—कसला मुकद्दमा ? मला तर कांहीं कळूं द्याल ?

**शेत०**—रामा पाटलानें शेतासंबंधानें माझ्यावर मुकद्दमा केला आहे ना ? तो. पाटील म्हणतो कीं शेत माझें आहे. आमची ग्रहदशा आहे झालें ! या मुकद्दम्याच्या पायीं यंदाचें पीक सुद्धां राहून गेलें.

**शे० बा०**—बाई ! तुम्हीच पहा. मुकद्दमा इतकीं वर्षे चालून अखेर हा निकाल !

**शेजा०**—हो हो. मुनसफ साहेबाच्या कोडतांत चालला होता तोच मुकद्दमा ना ? पण तो तर तुम्हीं जिंकला होता !

**शेत० बा०**—तें खरें. पण पाटील वरच्या कोडतांत गेला, अन् उलट निकाल घेऊन आला.

शेजा०—मग ? आतां पुढें काय करणार ?

शेत०—आमच्या मालकीचें शेत दुसऱ्याच्या हातांत जाऊं देणार नाहीं. त्याच्याहि वरच्या कोडतांत जाईन आणि भांडेन.

शेजा०—आणि त्यानेंहि पाटलाच्याच बाजूचा निकाल दिला तर ?

शेत०—तसें झालें तर आणखी वरच्या कोर्टांत दाद मागेन. माझें घरदार आणि सारी मालमिळकत या मुकद्दम्याच्या पायीं विकावी लागली तरी विकीन, पण पाटलाच्या हातांत शेत जाऊं देणार नाहीं.

शेजा०—या कोडतांचें काम म्हटलें म्हणजे असेंच. पण समजा कीं तुम्ही तेथेंहि हरला. तर मग पुढें ?

शेत०—तरी सुद्धां हिंमत सोडणार नाहीं हा गडी ! थेट विलायतेपर्यंत मुकद्दमा लढवीन.

( बैलाला आणखी गवत घालण्यासाठीं बाहेर जातो. )

कृष्णा—का ग आई ? विलायतेंतहि आपल्या विरुद्ध निकाल झाला तर ?

आई—बाळ ! विलायतचे लोक जें करतात तें सगळ्यांना मुकाट्यानें मानावें लागतें. त्यांच्या निकालापुढें आपलें कांहीं चालणार नाहीं.

कृष्णा—मग आई ! कांहीं कोडतें बाबांचें शेत म्हणून निकाल देतात, आणि कांहीं त्यांच्या अगदीं उलट रामा पाटलाला आपलें शेत देऊन टाकतात ! असें तीं काय म्हणून करतात ?

आई—शेत खरोखर कोणाचें आहे तें या मोठमोठ्या कोडतांच्या मुनसफांनाहि कळत नाहीं, म्हणून ते वाटेल तें म्हणतात. म्हणून कोडतांत जाऊन कोणाचें खरोखर शेत आहे तें आपणास सांगावें लागतें.

कृष्णा—कोडताच्या लोकांना ठाऊक नाहीं, तर मग त्यांच्याकडून निकाल करून घ्यायला जायचें कशाला ?

आई—गेलें नाहीं तर आपलें शेत दुसऱ्याच्या हातांत जाईल ना ? तें जाऊं द्यावयाचें कीं काय ?

शेजा०—बाळ ! आपणाला आपसांतले तंटे आपसांत तोडता येत नाहींत, येवढ्यासाठीं कोडतांत जावें लागतें.

कृष्णा—मी मोठा झाल्यावर माझा कोणाशीं तंटा झाला तर चिठ्ठ्या टाकीन. ज्याच्या नांवाची चिठ्ठी निघेल तो हरेल आणि दुसऱ्याला ती जिंदगी मिळेल. बस, असेंच करीन. मी अन् माझा सोबती गणू, आम्ही दोघे खेळतांना असेंच करतों.

शेजा०—हा मुलगा म्हणतो तें कांहीं खोटें नाहीं. असें केलें तर केवढी यातायात वांचेल ! नाहीं तरी एरवीं कोठें खरा न्याय मिळतो आहे ?

आई—आणि किती तरी खर्च वांचेल ! या मुकद्दम्यांत कांहीं नाहीं म्हटलें तरी शेताच्या किंमती इतका खर्च अगोदरच होऊन चुकला आहे. अन् अजून किती होईल हें कोणी सांगावें ? अशा कोडतांत आपण जाऊं नये हेंच खरें.

★



# फौजदारी कायदा

नर्मदा ( वय ११ ), पुष्पशील ( वय १० ) आणि चंदू ( वय १३ )

**चंदू**—पाहिलेंस ? सदूनें चोरी केली त्याबद्दल त्याला बक्षीस मिळालें.

**पुष्प०**—त्यानें खरोखर चोरी केली असली तर त्याला शिक्षा झाली हें ठीकच झालें म्हणावयाचें. पण काका म्हणत होते कीं, सदूनें चोरी केलीच नाहीं; आणि असें असून त्या बिचाऱ्याला उगाचच्या उगाच कैदेंत टाकिलें.

**चंदू**—असें काय ? सदूनें चोरी नव्हती केली तर ! तर मग ज्यांनीं त्याला उगाच शिक्षा केली अन् कैदेंत टाकिलें, त्यांना कांहीं होणार नाहीं काय ?

**नर्मदा**—सरकारच्या कायद्याविरुद्ध वागून ज्यानें वाईट काम केलें, त्याला शिक्षा व्हायलाच पाहिजे.

**पुष्प०**—पण दुसऱ्यांचा न्याय करणाऱ्या न्यायाधिशांना कोण शिक्षा करणार ?

**चंदू**—कां बरें ? त्यांच्यावर जे अधिकारी असतील त्यांनीं करायला पाहिजे.

**पुष्प०**—आणि त्यांनीं सुद्धां चूक केली तर ?

**नर्मदा**— त्यांच्याहि वर असतील ते अधिकारी शिक्षा करतील.

पुष्प०—बरोबर, सरकार सर्वांच्याच वर आहे. पण सरकार-च्याहि हातून चूक झाली तर त्याला कोण शिक्षा करणार ?

चंदू—सरकारला कोण शिक्षा करणार ? कोण बरें ?


नर्मदा—परमेश्वर, दुसरें कोण ?

पुष्प०—मग सदूला परमेश्वरानेंच कां शिक्षा केली नाहीं ? अधिकारी लोकांच्या हातून चुका होतात, तर मग ते भलत्यालाच शिक्षा करण्याच्या भानगडींत तरी कां पडतात ? परमेश्वराच्या हातून थोडीच चूक होणार आहे ? तेव्हां जो कोणी गुन्हा करील त्याला परमेश्वरानेंच एकट्यानें शिक्षा करावयाची असें झालें पाहिजे.

चंदू—असें कधीं झालें आहे ?

पुष्प०—कां नाहीं होऊं ?

चंदू—हरकत येवढीच कीं........पण ती पहा आई आपणांस बोलावीत आहे.



# कैद

हणमंत ( वय वर्षे १३ ), सरस्वती ( १० ), दुर्गा ( १० ) मदन ( १० ), बहिणा ( ८ ) फुलांच्या माळा गुंफीत आहेत.

**सरस्वती**—काल जनीनें केवढी आरडाओरड करून सोडली !

**बहिणा**—अन् मुलेंहि बिचारीं कशीं रडत होतीं !

**दुर्गा**—कशासाठीं ?

**सरस्वती**—तुला नाहीं ठाउक ? त्यांच्या बापाला पकडून कैदखान्यांत घेऊन गेले.

**बहिणा**—मग तीं बिचारीं रडणार नाहींत, तर काय करतील ?

**दुर्गा**—पण त्याला कैदखान्यांत काय म्हणून घेऊन गेले ?

**सर०**—कोणास ठाऊक ? आमच्या देखत शिपायांनीं येऊन त्याला मुसक्या बांधून नेलें खरें.

**हणमंत**—असें सांगतात कीं त्यानें दोन चार वेळां चोऱ्या के या होत्या.

**मदन**—मग त्याला कैदेंत ठेवायचें नाहीं, तर काय त्याची पूजा करावयाची ?

**दुर्गा**—पण त्या बिचाऱ्या पोरांनीं कोणता गुन्हा केला होता ?

**बहिणा**—बिचारीं तीन चार पोरें आहेत! तीं आता काय खातील ?

**सर०**—काल जनी आमच्या येथें येऊन खूप रडली. तेव्हां आईला दया येऊन तिनें त्या बिचाऱ्या पोरांना खायला घातलें.

**दुर्गा**—पण रोज रोज कोण असें त्यांना खाऊं घालणार ?

**मदन**—चोरी केली म्हणजे अशी दशा होते, तर चोरी करावीच कशाला ?

**सर०**—पण मुलांनीं कुठें चोरी केली ? त्यांच्या बापानें केली, त्यांत बिचाऱ्या पोरांची काय म्हणून उपासमार व्हावी ?

**मदन**—पण चोरी केली म्हणून ना ?

**दुर्गा**—बापानें चोरी केली, त्यांत मुलांचा काय अपराध होता ?

हण०—पुनः पुनः आपली मुलांची गोष्ट बोलत्येस ! मीं असें विचारतों कीं त्यांच्या बापानें असें काम करावेंच कशाला ? घरांत पुष्कळ मुलें असलीं म्हणून काय त्यांच्यासाठीं चोरी करायची ?

वहिणा—बरें, पण आतां कैदखान्यांत नेऊन त्याला काय करतील ?

सर०—कैदखान्यांत कोंडून ठेवून त्याच्याकडून काम घेतील.

दुर्गा—पण त्याला खायला तरी घालतील ना ?

मदन—खायला घालतात म्हणून तर लोकांना कैदखान्याचें येवढें भय वाटत नाहीं. तेथें काम करावें लागतें खरें; पण पोटाला तरी मिळतें. दुसरी तिसरी तर कांहीं काळजी नाहीं ? तुरुंगांत दुसरे चोर असतातच. त्यांच्याशीं मिळून मिसळून राहावयाचें, त्यांच्याशीं गट्टी करायची, आणि दुसऱ्या खेपेस न पकडले जातां शिताफीनें चोरी कशी करावी तें त्यांच्यापासून शिकायचें ! काका म्हणत होते कीं, त्या मुलांचा बाप पहिल्यांदा कैदखान्यांत जाऊन आला, तेव्हांपासूनच तो फार बिघडला.

दुर्गा—असें आहे, तर सरकार चोरांना कैदखान्यांत कां घालतें ?

सर०—तेंच कळत नाहीं.

वहिणा—कैदेंत ठेवून चोरांना फुकट खायला घालावयाचें ?

सर०—अन् चोरी करतां येत नसली तर ती करायला शिकवायचें !

दुर्गा—अन् बायका पोरांची उपासमार करावयाची !

**सर०**—बिचारीं पोरें आपल्या शेजाराला आहेत. त्यांचें आतां पुढें कसें होईल ?

**बहिणा**—तीं रोज येऊन खायला मागतील. मग का आपल्याच्यानें नाहीं म्हणवणार आहे ?

**दुर्गा**—पण तुरुंगांत कशासाठीं घालतात ?

**मदन**—जे लोक चोरी करतात त्यांना काय करावें ?

**दुर्गा**—काय वाटेल तें. पण अशा लोकांसाठीं असें कांहीं केलें पाहिजे कीं............

**हण०**—'कांहीं केलें पाहिजे' हें म्हणायला सोपें आहे. तुझ्यापेक्षां वयानें मोठ्या आणि अधिक शहाण्या लोकांनीं या गोष्टीचा विचार केला आहे. पण त्यांना सुद्धां कांहीं उपाय सुचत नाहीं. समजलीस ?

**दुर्गा**—मी राजा असत्यें, अन्....

**मदन**—ओहो ! बरें राजा असतीस, तर काय केलें असतेस ?

**दुर्गा**—असें केलें असतें कीं कोणाला चोरी करण्याचें कारणच पडूं नये.

**मदन**—पण हें कसें होणार ?

**दुर्गा**—न व्हायला काय झालें ? असें करावयाचें कीं ज्याला ज्या जिनसेची जरूरी लागेल ती त्याला मिळावी. मग कोणाचें चोरी करण्याचें अडलें आहे ? अशानें कोणाचें नुकसान होणार नाहीं आणि सगळेचजण सुखानें राहतील.

**हण०**—पण हें कसें करावयाचें हा तर प्रश्न आहे.


**दुर्गा**—वाटेल त्या रीतीनें. पण मी राजा झाल्यें तर असचें करीन.

**वहिणा**—पण आपणाला उशीर होत आहे बरें का !

**सर०**—मोगऱ्याच्या कळ्या तर अजून व्यावयाच्याच राहिल्या आहेत !

**मदन**—हो ! खरेंच. चला, या पहा पुष्कळ कळ्या आहेत. ( दुर्गेला ) पण राजेसाहेब ! सांभाळा हो. नाहींतर गोळा केलेलीं फुलें हातांतून गळून पडतील एखादीं.

( सगळीं मुलें मोगऱ्याच्या ताटव्याकडे धावत जातात. )



# फाशीची शिक्षा

[ प्रोफेसर प्रफुल्लचंद्र, भानुमती ( त्यांची पत्नी ), विनोद ( त्यांचा मुलगा ) अमरसिंह ( लष्करी अंमलदार ), व प्रोफेसरांची मित्रमंडळी. ]

**अमर०**—पण इतिहासावरून आपणांस काय दिसतें ? फ्रान्सच्या राज्यक्रांतीच्या वेळीं आणि दुसऱ्याहि अनेक प्रसंगीं जे समाजाविरुद्ध गुन्हा करणारे व त्याचें नुकसान करणारे असतात, त्यांना दूर करण्यापासूनच चांगला परिणाम घडतो असें दिसून येत नाहीं काय ? आणि आजसुद्धां आपण तेंच पाहत आहों.

**प्रोफे०**—पण अशा सक्त उपायांचा समाजावर काय परिणाम घडतो तें जाणण्याचा प्रयत्न कांहीं दिवस तुम्हीं करून पाहिला हें खरें ना ?

अमर०—वाईट परिणाम होतो असें मानण्याला कांहींच कारण नाहीं. पण तो होतो असें घटकाभर धरून चाललों, तरी तो परिणाम सक्तीच्या उपायामुळेंच घडला असें खात्रीपूर्वक म्हणतां येत नाहीं. दुसरें असें कीं ज्यांच्यांतून मनुष्यवृत्ति निघून गेल्यामुळें जंगली पशूंप्रमाणें ज्यांचें वर्तन घडत असतें त्यांच्यावर कडकपणाचा परिणाम झाल्यावांचून राहत नाहीं. जो मनुष्य शंभर रुपयांसारख्या क्षुद्र रकमेसाठीं एक स्त्री व तिचीं तीन निरपराधी मुलें यांचे खून करतो, त्याच्याशीं कडकपणाचें नाहीं तर कशा रीतीचें वर्तन ठेवायाचें ? तुम्हीच सांगा ?

प्रोफे०—अमरसिंहजी ! मी फाशीच्या शिक्षेच्या साफ विरुद्ध आहे असें नाहीं. पण कोर्ट मार्शलकडून क्षुद्र बाबतींतसुद्धां जो कडकपणा दाखविण्यांत येतो त्यालाच माझी हरकत आहे. अशा कडक शिक्षांमुळें लोकांच्या मनांत दहशत बसत असली, आणि तिच्यामुळें गुन्हा करण्यास त्यांचें मन कचरत असलें तर ठीक आहे. पण ‘ अतिपरिचयादवज्ञा ’ या म्हणीप्रमाणें वारंवार घडणाऱ्या कडक शिक्षांमुळें त्या कडकपणांतलें भय नाहींसें होऊन लोक निगरगट्ट बनतात.

अमर०—हा एक गैरलाभ कदाचित् असेल. पण एकंदरींत लाभाचें प्रमाण फार मोठें असतें हें विसरून चालायचें नाहीं.

प्रोफे०—माझें म्हणणें तरी हेंच कीं कडक शिक्षेचा अखेर लोकांवर काय परिणाम होतो त्याचा तपास करण्याची जरूरीच आपणांला कधीं वाटली नाहीं.

**अमर०**—पण असल्या निर्दय अपराध्यांना समाज शिक्षा करणार नाहीं, तर कसें चालेल ?

**प्रोफे०**—तर मग काय समाजानें त्यांचा सूड उगवावा म्हणतां ?

**अमर०**—नाहीं. नाहीं. तसें नाहीं. खाजगी रीतीनें सूड उगवण्याच्या ऐवजीं त्यांना जाहीर रीतीनें शिक्षा करावी.

**प्रोफे०**—बरोबर. पण मग ही जाहीर रीतीची शिक्षा देशाच्या चालू कायद्याप्रमाणें करण्याला कोणती हरकत आहे ? असा विलक्षण व झटपट उपाय कशासाठीं करावयाचा ?

**अमर०**—सामान्य मनुष्य आवेशाच्या भरांत जो बेकायदेशीर व अन्यायाचा सूड घेतो त्याच्याच ऐवजी ही जाहिर शिक्षा ठेवलेली आहे.

**प्रोफे०**—( रागावून, ) तर मग काय तुमचें असें म्हणणें कीं सध्यां ज्या शिक्षा देण्यांत येतात त्या सगळ्या अगदी न्यायाच्या, सगळ्या गोष्टींचा पुरा तपास करून दिलेल्या आणि बरोबर असतात ? मी खरोखर कधीं हें कबूल करणार नाहीं. तुम्हीं काय हवें तें म्हटलें, तरी सध्या हजारों जणांना फाशीच्या ज्या शिक्षा देण्यांत येत आहेत त्या कायदेशीर किंवा समाजाला हितावह असतात अशी माझ्या मनाची खात्री होत नाहीं.

( खुर्चीवरून उठून रागारागानें खोलींत फिरतो. )

**विनोद०**—( भानुमतीला ) आई ! बाबा कां ग असे भांडतात?

भानु०--त्यांचें म्हणणें असें आहे कीं फाशीची शिक्षा वरचेवर देऊं नये.

विनोद०--फांशीची शिक्षा म्हणजे काय?

भानु०--अपराध्याला दोराला टांगून त्याचा जीव घेतात, त्याला फाशीची शिक्षा म्हणतात.

विनोद--पण एखाद्याला कशासाठीं असें मारून टाकतात?

भानु०--इकडचें म्हणणें तरी हेंच आहे कीं कित्येक वेळां दुसरा उपायच असला म्हणजे पाहिजे तर फाशीची शिक्षा द्यावी.

विनोद--पण कित्येक वेळां तरी काय म्हणून द्यावी? (प्रोफेसरसाहेबाजवळ जाऊन) बाबा! दुसऱ्याचा जीव घेणें हें पाप नाहीं काय?

प्रोफे०--हो. आहे. एका माणसानें दुसऱ्याला मारून टाकिलें तर तें पापकृत्य समजलें जातें, पण आम्ही निराळ्याच गोष्टीविषयीं बोलत होतों. अपराध्याला शिक्षा म्हणून फाशीं देण्यांत पाप नाहीं.

विनोद--पण फांशी देतांना माणसाचा जीव घेण्यांत येतोना?

प्रोफे०--होय, पण ती गोष्ट निराळी.

विनोद--निराळी कशी! या दोहोंत कोणता फरक आहे?

प्रोफे०--फरक तर आहेच. पण तो तुला कसा कळणार? उदाहरणार्थ, लढाईत एका शिपायानें दुसऱ्याला मारून टाकलें तर चालतें. त्याचप्रमाणें गुन्हेगाराला फासावर चढविण्यांत पाप समजत नाहींत. खून करणाराला मात्र शिक्षा केल्याशिवाय कसें चालेल?

विनोद--त्याला क्षमा करून त्याच्यावर आपण प्रेम नको का

करायला ? त्या दिवशीं तुम्हीच म्हणत होतां ना कीं आपण प्राणि-मात्रावर प्रेम करायला पाहिजे ?

**प्रोफे**——तसें करतां आलें तर चांगलेंच. पण नेहमीं असें कुठें करतां येतें ?

**विनोद**——कां नाहीं करतां येणार ? गुन्हेगार झाला तरी प्राणीच ना ?

**प्रोफे०**——कारण कीं——कारण कीं——छे: ! असें नाहीं करतां येत. ( अमरसिंह विनोदाचें भाषण कौतुकानें ऐकतो. त्याच्याकडे वळून ) अमरसिंह ! माझें मत असें आहे. असामान्य परिस्थितींत सुद्धां कडकपणापासून कांहीं लाभ होतो असें मला वाटत नाहीं आणि कोणीं दाखविला तरी मी तो मान्य करणार नाहीं.

# वसूल

[ गांवचा तलाठी शेतकऱ्याच्या खोपटांत जातो. तेथें त्या शेतकऱ्याची ७ वर्षांची मुलगी मुक्ता एकटी बसलेली दिसते. ]

**तलाठी**——( आजूबाजूला पाहून ) कोणीच माणूस घरांत नाहीं कीं काय ?

**मुक्ता**——नाहीं. काय काम आहे ?

**तलाठी**——तुझा बाप कोठें गेला ?

**मुक्ता**——शेतावर.

**तलाठी**---ठीक. पण तो घरीं येईल तेव्हां त्याला म्हणावें कीं गांवचा तलाठी तीनदां येऊन गेला, पण अजून वसूल भरणा झाला नाहीं. आतां या रविवारपर्यंत जर भरणा केला नाहीं, तर दारची गाय सोडून तिचा लिलांव करण्यांत येईल हें ध्यानांत ठेव.

**मुक्ता**---गाय सोडून नेणार? काये म्हणून? तुम्ही काय चोर आहां? तुम्ही न्याल, पण आम्ही बरे नेऊं देऊं?

**तलाठी**---वा:! तूं फार हुशार मुलगी दिसतेस! तुझें नांव काय?

**मुक्ता**---मुक्ता.

**तलाठी**---ठीक. मुक्ता! ऐक. तुझ्या बापाला सांग कीं मी कांहीं चोर नाहीं. पण साऱ्याची रकम वेळेवर भरली नाहीं, तर गाय सोडून घेऊन जाईन. समजलीस?

**मुक्ता**---चोर नाहीं, तर गाय काय म्हणून नेणार?

**तलाठी**---कारण, कायद्याप्रमाणें तुम्हांला वेळेवर वसूल भरावयास पाहिजे. तुम्हीं पैसे भरले नाहींत, तर गाय न नेऊं तर काय करूं?

**मुक्ता**---वसूर? वसूर तो काय असतो?

**तलाठी**---काय मिस्किन् पोरगी आहे अग, वसूर नाहीं, वसूल-सारा–शेतकऱ्याकडून जो पैसा घेण्यांत येतो तो. आतां समजलीस?

**मुक्ता**---कोण घेतात?

**तलाठी**---सरकार.

**मुक्ता**---कोणासाठीं?

**तलाठी**—कोणासाठीं म्हणजे? स्वतःसाठीं.

**मुक्ता**—पण कशासाठीं? सरकारला काय भीक लागली आहे गरीबांपासून पैसे घ्यायला? आम्ही आहोंत गरीब माणसें आणि सरकार आहे श्रीमंत. मग आम्हां गरीबांपासून सरकार काय म्हणून पैसा घेतें?

**तलाठी**—सरकार कांहीं स्वतःसाठीं पैसा नाहीं घेत. त्याच्या-मागेंहि खर्च लागलाच आहे! फौज ठेवावी लागते; त्याला पैसा लागतो. शाळा, दवाखाने, कोर्टे, कचेऱ्या उघडाव्या लागतात. हीं कामें काय पैशावांचून होतात? सरकारला नोकरांचे पगार द्यावे लागतात. आपल्याच लोकांच्या हितासाठीं आपल्यापासून सरकार पैसा घेतें. समजलीस?


**मुक्ता**—पण आमची गाय तुम्ही घेऊन जाणार, त्यांत आमचें कोणतें हित होणार आहे?

**तलाठी**—तें तुला आत्तांच कसें कळणार? मोठी झालीस म्हणजे कळेल. मी आतां जातों. उशीर झाला आहे. मीं सांगितलें तसें तूं आपल्या बापाला सांग. वरं का!

**मुक्ता**—असें खोटें मी नाहीं सांगणार. तुम्हांला किंवा सरका-रला पाहिजे असेल, तर तुम्ही आपले पैसे मिळवा आणि वाटेल तें करून घ्या. आम्हांला काय म्हणून त्रास? आम्ही आहों अन् आमचें काम आहे. पण आमची गाय आम्ही घेऊन जाऊं देणार नाहीं.

**तलाठी**—( जातां जातां ) ही छोकरी मोठी झाली म्हणजे सर-कारला भारी होईल!

★



# (अंमल)

[ मंगळ (१२ वर्षें), भागीरथी (वर्षें ५), रामचंद्र (वर्षें १०). मंगळ आणि भागीरथी झोपड्यांतून निघून बंगल्यापाशीं येतात. बंगल्याच्या मालकाचा मुलगा रामचंद्र बंगल्याच्या ओट्यावर उभा आहे. अंधार पडण्याची वेळ.]

**राम०**—आजचा प्रकार कसा काय आहे ?

**मंगळ**—आजहि पुनः प्यालाच आहे !

**राम०**—कोण ? रामलाल ?

**मंगळ**—हो. दुसरा कोण ?

**भागी०**—पितो तो पितो अन् आईला मारतोहि. ( रडते. )

**मंगळ**—मी तर घरीं जायचेंच नाहीं असें मनाशीं ठरविलें आहे. मलाहि मारतो.

[ थोडा वेळ कोणीच बोलत नाहींत. भागीरथी रडते].

**राम०**—( भागीरथीला ) रडूं नकोस. रडण्यानें काय होणार ?

**भागी०**—माझ्या हातांत सरकारसारखी सत्ता येईल तर दारू किंवा ताडी विकणाराला कडक शिक्षा करीन.

**मंगळ**—वा: ! सरकार स्वतः दारू विकतें. दुसऱ्याला मात्र थेंबभरसुद्धां विकूं देत नाहीं !

**राम०**—भलतेंच ! असें कधीं झालें आहे ?

**मंगळ**—मी काय खोटें सांगतों ? हवें त्याला विचार. परवा रघूला कां शिक्षा झाली माहीत आहे ?

भागी०—आम्हांला नाहीं माहीत. तूंच सांग कशाकरितां तें !

मंगळ—त्यानें ताडी विकली म्हणून.

राम०—असें ? मला वाटलें होतें कीं त्यानें कांहीं गुन्हा केला असेल.

मंगळ—गुन्हा तर खराच. सरकारच्या परवान्यावांचून ताडी विकणें हा कायद्याच्या दृष्टीनें गुन्हाच मानिला गेला आहे.

भागी०—कांहींहि असो. मी कोणाला दारू विकूं देणार नाहीं. कारण, दारुडे लोक रोज पिऊन येऊन धिंगामस्ती करतात.

राम०—तूं काय म्हणत्येस तें मला नाहीं समजत. उद्या मास्तर साहेबांना विचारलें पाहिजे.

मंगळ—हां हां. ठीक बोललास. मास्तर साहेब खरें खरें सांगतील.

( दुसरे दिवशीं रामलालचा कैफ उतरल्यावर तो शेतावर कामाला गेला. त्याची बायको घामानें निथळत होती. आणि रडून रडून तिचे डोळे सुजले होते. ती चुलीपाशी भाकरी करीत बसली होती. रामचंद्र शाळेंत गेला. शाळेची वेळ झाली नसल्यानें दुसरी मुलें अजून आली नव्हती. मास्तर आज लवकर येऊन खुर्चीवर बसल्या बसल्या विडी फुंकीत होते. )

राम०—( मास्तरजवळ जाऊन ) सर ! रघूनें ताडी विकली म्हणून सरकारचे शिपाई त्याला पकडून घेऊन गेले, अन् सरकार स्वतः दारू–ताडीचा व्यापार करतें, त्याला कोणी कांहीं करीत नाहीं. हें कसें ?

मास्तर—मूर्ख आहेस ! सरकार असला व्यापार कशाला

करील ? रघूला पकडून नेलें याचें कारण त्यानें परवान्यावाचून ताडी विकली हें आहे.

राम०—बरं, विकली. पण त्यांत कुठें काय बिघडलें ?

मास्तर—सरकारला जो मक्तेदार सर्वांत जास्त पैसे देतो, त्यालाच परवाना मिळतो; आणि परवान्यावांचून दारू विकायची नाहीं. असा कायदा आहे. यामुळें सरकारला वर्षाचे कांहीं चांगलें दहा पंधरा कोटि रुपयांचें उत्पन्न होतें.

राम०—तर मग जितका दारूचा खप जास्त होतो तितका सरकारला जास्त पैसा मिळतो, असेंच कीं नाहीं ?


मास्तर—हो. असेंच, जो सर्वांत ज्यास्त ताडी व दारू खपवील त्यालाच सरकारला ज्यास्त पैसा देतां येईल. आणि त्यालाच परवाना मिळेल. पुढच्या वर्षीं पुनः परवाना पाहिजे असेल तर त्यानें शक्य तेवढी ज्यास्त ताडी व दारू खपविण्याची खटपट केली पाहिजे. सरकारला हें उत्पन्न मिळतें, म्हणून तर त्याला लष्करी व इतर खर्च करतां येतात.

राम०—पण या खात्यावर खर्च करायला पाहिजेच असेल तर त्या खर्चासाठीं सरकार दारू विकून कां उत्पन्न उभें करतें ? लोकांना दारू ताडी न विकतां त्यांच्याजवळून तेवढे पैसे कां उकळीत नाहीं ?

मास्तर—कारण........असें पहा........असा कायदा आहे.

(इतक्यांत घड्याळांत अकराचे ठोके पडले आणि शाळेंतली दुसरीं मुलेंहि गोळा झाली. ) चला, मुलांनो ! आपण अभ्यासाला लागूं.

★



# दया

[ गोदूताई आणि नाना दारापाशीं पडलेल्या रेतींत घरें बांधीत बसलीं आहेत. माणून म्हातारी येते. ]

**नाना**—( चिडून ) असें नाहीं. हळू हळूं रेती काढ........ पहा कशी लबाड आहे ! माझा बंगला सगळा पाडून टाकला ! मी नव्हतों सांगत ?

**म्हातारी**—( घराच्या बाहेर पडतांना ) किती छान बाई आहे ! परमेश्वर हिला सुखी राखो.

**नाना**—कोण ? आजीबाई ? कोणाविषयीं तुम्ही बोलत आहां ?

**म्हातारी**—तुझ्या आईविषयींच, ती गरीबगुरिबांवर फार दया करणारी आहे. हें पहा ना ?' आतांच हें लुगडें आणि तांदूळ तिनें मला दिलें. ईश्वर तिचें कल्याण करो. ( पुढें जाऊन थांबते. ) त्या दुसऱ्या बाईसारखी नाहीं. त्या बाईकडे काल गेलें होत्यें, तेव्हां ती म्हणाली, ' तुम्हां लोकांना मागण्याशिवाय दुसरा धंदाच नाहीं वाटतें ! ' आणखी तिचा तो कुत्राहि फार द्वाड आहे. मेला चावायला माझ्या मागें धावला होता !

**गोदू०**—कोणाच्या घरची गोष्ट, आजीबाई ?

**म्हातारी**—त्या ताराबाईच्या घरची. परमेश्वरानें तिला नुसती श्रीमंती दिली आहे इतकेंच. तिच्या अंतःकरणाला दया माया कशी

ती ठाऊकच नाहीं. देव तिला पाहून घेईल. पण तुमची आई किती चांगली आहे ! अशीं दयाळू माणसें जगांत नसलीं तर आमच्या सारख्या गरिबांचा वाली या जगांत कोण आहे ? ( रडते )

**गोदू०**—( नानाला ) बिचारी रडते आहे !

**म्हातारी**—बाळांनो ! तुम्ही पण मोठेपणीं तुमच्या आईसारखे परोपकारी व्हा, आणि गरिबांचा सांभाळ करीत जा, म्हणजे परमेश्वर तुमचा सांभाळ करील. ( म्हातारी जाते. )

**नाना**—बिचारी किती गरीब आहे !

**गोदू०**—खरेंच दादा. आईनें हिला लुगडें आणि तांदूळ दिले हें चांगलें केलें.

**नाना**—खरेंच. आपणाला देवानें पुष्कळ दिलें आहे. मग त्यांतलें थोडें गरीबाला द्यायला आपलें काय वेंचतें ? आपण कांहीं गरीब नाहीं, आणि ही बाई तर गरीब आहे. मी म्हणतों तें खरें ना ?

**गोदू०**—खरेंच. गरिबांना दिल्यानें पुण्य लागतें.

**नाना**—मी मोठा होईन तेव्हां माझ्या जवळचें सगळेंच गरिबांना देऊन टाकीन.

**गोदू०**—वा: ! असें कसें करतां येईल ?

**नाना**—कां बरें ?

**गोदू०**—तुझ्या जवळचें सगळें देऊन टाकिल्यावर तूं काय करशील ?

**नाना**—माझें मीं वाटेल तसें पाहून घेईन. आपण सर्वांवर दया करावी आणि भलेपणा धरावा म्हणजे सर्वजण सुखी होतील.

( खेळण्याचें टाकून घरांत धावत जातात आणि कागदावर 'आपण सर्वांवर दया करावी' असें ठळक अक्षरांनीं लिहून तो कागद भिंतीवर चिकटवितात. )

★

# प्रेम-धर्म

[ तारा वय वर्षें १०; भगवान् वय वर्षें ८. ]

**तारा**—माझा तर असा विचार होता कीं भाऊ ऑफिसांतून लवकर आला म्हणजे आपण त्याच्याबरोबर बागेंत फिरायला जायचें. पण तुला कोठें जावेंसें वाटतें सांग ?

**भग०**—मला वाटतें कीं कालच्यासारखें मावशीच्या घरीं जायला मिळेल तर चांगलें.

**तारा**—छे: छे: ! काल नाहीं पाहिलेंस ? सुशीलेनें तुला मारलें, आणि मग तूं रडूं लागलास. असें करण्यापासून कोणता लाभ ?

**भग०**—वा: ! याहून आणखी चांगलें काय पाहिजे ? आजही पुन: तसेंच झालें तर मला खरोखर आवडेल.

**तारा**—तूं काय म्हणतोस तें मला नाहीं कळत.

**भग०**—कां बरें ? त्या दिवशीं भाऊनें सांगितलें तें तुझ्या लक्षांत नाहीं वाटतें ? इतक्यांत विसरलीस ? आपलें कोणी नुकसान केलें तरी त्याच्यावर आपण प्रेम केलें पाहिजे. महात्मा गांधी सुद्धां असेंच म्हणतात.

तारा—खरेंच, आई म्हणत असते कीं महात्मा गांधी हे एक ईश्वरी अवतार आहेत.

भग०—मी या संबंधांत आणखी एक गोष्ट ऐकली आहे. ती अशी–एक माणूस होता. लोक त्याला भारी त्रास देत. पण जसजसे लोक त्याला त्रास देऊं लागले, तसतसा तो त्यांच्यावर अधिकच प्रेम करूं लागला. लोकांनीं त्याला शिव्या दिल्या, म्हणजे त्यानें शिव्या देणारांशीं गोड शब्द बोलावे. कोणीं त्याला मारलें, तर त्यानें उलट मारणारांचे पाय चेपावे. कोणी त्याचें नुकसान केलें, तर त्यानें उलट त्यांना मदत करावी. भाऊ म्हणतो कीं हीं सगळीं साधूंचीं लक्षणें आहेत, अशा माणसांच्या मनाला कधीं दुःख म्हणून शिवत नसतें. ही साधूची गोष्ट माझ्या मनाला फारच लागून राहिली. काल सुशीलेनें मला मारलें, तेव्हां त्या गोष्टीची मला आठवण झाली, म्हणून मला तिनें मारलें तरी मी कांहीं बोललों नाहीं, उलट तिला शाबासकी दिली ! पण यामुळें झालें काय ? माझा सारा दिवस अतिशय सुखांत गेला. पण आज सकाळीं काकू मला रागें भरल्या, त्या वेळीं ती साधूची गोष्ट मी विसरलों, आणि रागारागानें एका कोपऱ्यांत रुसून बसलों. आतां मला वाटतें कीं, मीं तसें करायला नको होतें. म्हणून कालच्या-सारखें आज पुनः मावशीच्या घरीं जाऊन करावें असें माझ्या मनाला वाटतें.

तारा—काय करावसें वाटतें ? मार खावा असें ?

भग०—हो. आज मला कोणीं मारलें तर मी उलटून चकार शब्दसुद्धां तोंडांतून काढणार नाहीं; उलट आनंदच मानीन.

तारा०—काय वेड्यासारखें बोलतो आहेस ! मूर्ख आहेस झालें !

भग०—बरें बुवा ! मी आपला मूर्ख तर मूर्ख ! पण माणसाला सुख हवें असलें तर त्यानें असेंच करायला पाहिजे असें मला वाटतें.

तारा—जा, जा ! भलतेंच कांहीं धरून बसतोस. अशा वागण्यानें कोणाला तरी सुख लागणार आहे का ?

भग०—तूं कांहींहि म्हण. पण सर्वांवर प्रेम करण्यानेंच माणूस सुखी होतो अशी माझ्या मनाला खात्री वाटते.



# पश्चात्ताप

[ सुंदरी ( वय ८ वर्षें ) हातांत ताटली घेऊन उभ्या उभ्या रडत आहे. इतक्यांत माधव ( वय १० वर्षें ) सुंदरीला मोठ्यानें हाका मारीत येतो.]

माधव—सुंदर ! ए सुंदर ! येथें ग काय करत्येस ? आई केव्हांची बोलावते आहे तुला ! ( सुंदरीला रडतांना पाहून ) पण हें काय ? रडत्येस कां अशी ? आणि सत्यनारायणाचा प्रसाद कुठें आहे ? ( ताटली रिकामी पाहून ) काकूला देऊन आलीस वाटतें ?

सुंदर—नाहीं. उं....उं....उं....चुकून मींच तो खाल्ला.( रडते )

माधव—तूंच खाल्लास ? पण तो काकूला नेऊन दे म्हणून

आईनें तुला सांगितलें होतें ना ? ' मी काकूला नेऊन देत्यें, आण '
असें आईला तूंच म्हणाली होतीस ना ?

**सुंदरी**—हो. पण वाटेंत मला तो खावासा वाटला, अन् मी ....उं....उं........ ( रडते )

**माधव**— ( तिची नक्कल करून ) खावासा वाटला आणि हातांत घेऊन खाल्ला. असेंच कीं नाहीं ? ( हसतो. )

**सुंदरी**—तुला हसूं येतें. पण आतां माझें कसें ? मी काय करूं ? काकूला काय जाऊन सांगूं ? अन् आईला तरी काय सांगूं ? माझ्यानें नाहीं कांहीं सांगवत.

**माधव**—मग खाल्लास कशाला प्रसाद ? तुला मिळालेला प्रसाद तूं नव्हतास खाल्ला ?

**सुंदरी**—खाल्ला होता. पण.... ( रडते )

**माधव**—पण....काकूसाठीं दिलेलाहि खाल्ला. का ? असेंच ना ? ( हसतो आणि सुंदरी रडते ) बरें, चल. रडायला कशाला पाहिजे ? आईची समजूत करतां येईल.

**सुंदरी**—ती कशी करणार ? सांग ?

**माधव**—त्यांत काय मोठें कठीण आहे ? हवी ती बात झोकून देतां येईल.

( थोडा वेळ दोघेहि गप्प बसतात. )

**सुंदरी**—पण आईला खरा प्रकार कळला म्हणजे ? ( रडते )

**माधव**—ऊं: ! त्यांत एवढें घाबरण्यासारखें काय आहे ? रडूं नकोस. जा, अन् आईला खरा प्रकार सांग.

सुंदरी—( अश्रू पुशीत ) नाहीं भाऊ. खरी गोष्ट आईला कळल्यावर ती रागावेल.

माधव—तर मग काकूला जाऊन सांग.

सुंदरी—पण तिला तरी मी खरी गोष्ट कोणत्या तोंडानें सांगू ?

माधव—तर मग आपण असें करूं. तूं इथेंच उभी राहा. मीच जाऊन काकूला सांगतों.

सुंदरी—नाहीं. नाहीं. मग मला तिला तोंड दाखवितां येणार नाहीं. ( रडत्ये. )

माधव—मग खावें कशाला ? मीं काकूला सांगून येतों. ( धावत जातो ).

सुंदरी—थांब. भाऊ ! थांब. अरे हा तर चालता झाला ! आतां मी काय करूं ? ताटलींतल्या प्रसादाची जरा चव बघितली ! आणि पाहतां पाहतां सगळा खाऊन गेल्यें. ( रडते )

माधव—( परत येऊन ) चल. रडणें थांबीव. मीं नव्हतें सांगितलें तुला ? तस्सेंच झालें. काकू कांहीं एक बोलल्या नाहींत. इतकेंच म्हणाल्या कीं, 'सुंदरीनें खाल्ला ना ? आहे मला ठाऊक. ती तशीच द्वाड पोरगी आहे.'

सुंदरी—( थोडा वेळ रडणें थांबवून ) पण काय रे ? काकू माझ्यावर रागावल्या नाहींत ?

माधव—छे: ! मुळींच नाहींत. तूं काकूला प्रसाद द्यायला गेली असतीस, तर त्यांनीं त्यांतला थोडासा स्वत:ला ठेवून बाकीचा तुलाच दिला असता.

सुंदर—भाऊ ! खरेंच सांगत्यें, मीं कांहीं जाणून बुजून तो खाल्ला नाहीं. चुकून माझ्या हातून ती गोष्ट घडली.

( पुनः रडूं लागते. )

माधव—झालें तें झालें. आतां काय त्याचें ? आतां कशाला रडत्येस ? काकू कांहीं बोलल्या नाहींत अन् आतां आपण आईला ही गोष्ट मुळीं सांगणारच नाहीं म्हणजे झालें.

सुंदरी—( रडत रडत ) काकू रागावल्या नाहींत. कारण, त्यांचा स्वभाव चांगला आहे; मीच द्वाड आहें. मी चोरून प्रसाद खाल्ला याबद्दल मला भारी वाईट वाटतें. ( रडते. )

# कटुभाषण

[ सुभद्रा वय वर्षे १०, विमला वय वर्षे ९; कमला वय वर्षे ६ ]

सुभद्रा—मीं भाऊरायाला म्हटलें कीं आपण कपडे न वापरले तर चालेल. तो म्हणाला, नाहीं चालणार. मीं म्हटलें 'हरिभाऊ तर सांगतात कीं आपलें तोंड नेहमीं उघडें असतें, आणि थंडी व गरमी दोन्ही त्याला सहन करावीं लागतात; तसें आपणाला सगळें अंग उघडें ठेवतां येईल.' तेव्हां भाऊराया म्हणाला, 'हरिभाऊ मूर्ख आहे.' ( हसते. ) पण हरिभाऊ कालच म्हणत होते कीं भाऊ मूर्ख आहे ! ( पुनः मोठ्यानें हसते. )

विमला—मी जर तुझ्या जागीं असत्यें, तर भाऊला त्याच्या तोंडावर सांगितलें असतें कीं तूं हरिभाऊला मूर्ख म्हणतोस, नी हरिभाऊ तुला मूर्ख म्हणतात.

सुभद्रा—पण दोघांत खराखरा मूर्ख कोण तें मी बरोबर समजल्यें नाहीं.

कमला—दोघेहि सारखेच मूर्ख म्हणावयाचे! दुसऱ्याला मूर्ख म्हणणारा स्वतःच मूर्ख असतो.

विमला—पण आत्तां तूं दोघांनाहि मूर्ख म्हणालीस, तेव्हां तूंहि पण मूर्ख ठरलीस. खरें ना?

सुभद्रा—पण असें एखाद्याच्या पाठीमागें त्याला नांवें ठेवणें मला नाहीं आवडत. मी मोठी झाल्यावर कधीं असें करणार नाहीं. माझ्या मनाला योग्य दिसेल तें तोंडावर बोलून टाकीन.

विमला—मी पण असेंच करीन.

कमला—मी सुद्धां आपल्या मर्जीला येईल तसेंच करीन.

सुभद्रा—म्हणजे ग काय?

कमला—म्हणजे बोलावेंसें वाटलें तर बोलेन. नाहीं बोलावेंसें वाटलें तर बोलणार नाहीं.

सुभद्रा—तूं किती मूर्ख आहेस?

कमला—पण कोणालाहि कडू शब्द बोलूं नये असें आतांच ना तूं म्हणालीस?

सुभद्रा—हो. पण कोणाच्या पाठीमागें तर नाहीं ना मी बोलल्यें?

★

# धर्म

[ लिली आणि तिची आई. ]

**लिली**—आई ! आज दादा न् भाऊ यांनीं नवे नवे कपडे कां ग घातले आहेत ?

**आई**—अग, आज सणाचा दिवस आहे ना ? आज आपल्यालाहि कृष्णमंदिरांत देवाच्या दर्शनाला जायचें आहे. तुला यायचें आहे ना ?

**लिली**—हो, पण आई ! आज कसला सण आहे ?

**आई**—गोकुळअष्टमीचा.

**लिली**—म्हणजे काय ?

**आई**—म्हणजे आज कृष्णाचा जन्मदिवस आहे.

**लिली**—पण आपली बाळी झाली त्या दिवशीं आपण सण केला नाहीं तो ?

**आई**—अग वेडे ! आपली बाळी देव का आहे सण करायला ? कृष्ण देवाचा अवतार म्हणून त्याचा जन्मदिवस आपण सणासारखा पाळतों.

**लिली**—पण आई ! देव कुठें ग राहतो ?

**आई**—स्वर्ग लोकांत.

**लिली**—अन् स्वर्ग कुठें आहे ?

**आई**—वर आकाशांत.

लिली—पण दादांचे मास्तर म्हणत होते कीं आकाश म्हणून कांहीं नाहींच. ती नुसती पोकळ जागा आहे.

आई—तें बाई मला नाहीं समजत. मी कुठं येवढी शिकलेली आहे? जुने लोक सांगत आले त्यावर श्रद्धा ठेवायची येवढें मला ठाऊक आहे.

लिली—श्रद्धा ठेवायची म्हणजे काय करायचें?

आई—म्हणजे लोक सांगतील तें खरें समजून चालायचें. खोटें असेल अशी शंकासुद्धां मनांत येऊं द्यायची नाहीं.

लिली—पण आई! काल भाऊ शाळेला जायला निघाला, तेव्हां वाटेंत एक मांजर आडवें गेलें. ते वेळीं ताई त्याला म्हणाली कीं जरा थांबून जा; तसाच पुढें शाळेला जाऊं नकोस. तेव्हां तूंच म्हणाली होतीस ना कीं अशी भलतीच वेडी समजूत कां घेऊन बसतोस म्हणून?

आई—हो. खरेंच तें. मनाच्या भलभलत्या खोट्या समजुती करून घेऊंच नयेत.


लिली—पण आई! अमुक गोष्ट खरी न् अमुक खोटी हें कसें ओळखायचें?

आई—धर्मावर श्रद्धा ठेविली म्हणजे सारें कळतें.

लिली—पण धर्म म्हणजे काय?

आई—धर्म म्हणजे?........( मनांत ) धर्म म्हणजे काय बरें सांगूं हिला? ( मोठ्यानें ) पण आपल्याला कृष्णमंदिरांत जायचें आहे ना? आपण अशा बोलत बसलों तर उशीर नाहीं

का होणार ? बापूजी म्हणावें आम्ही देवदर्शनाला जातों आहों. तूं घरींच राहा. कुठें जाऊं नकोस.



# शिक्षण

[ घरचा नोकर बाळू टेबलावरची धूळ झाडून टेबल साफ करीत आहे. कृष्णा लाकडाचे ठोकळे रचून घर बांधीत आहे. वसंत ( वय १५ ) शाळेंतून येऊन टेबलावर जोरानें दप्तर आपटीत आहे. ]

**वसंत**—आग लागो या शाळेला अन् बुकांना !

**बाळू**—असें का छोटेसाहेब ! आज झालंय तरी काय तुम्हांला असें रागवायला !

**वसंत**—पुनः नापास झालों. आतां सगळेजण मला बोचबोचून घेतील. त्या कमनशीब भूगोलाशीं खरें पाहिलें तर मला काय करायचें आहे ? कामश्चाटका, मासाचुसेट अन् हो–आंग–हो—असलीं नांवें पाठ करून मला कोणता लाभ होणार आहे देव जाणे !

**बाळू**—पण छोटेसाहेब ! तुम्ही नापास झालां, तेव्हां आतां पुढें काय करणार आहां ?

**वसंत**—दुसरें काय करायचें ? आणखी एक वर्ष याच वर्गांत राहिलें पाहिजे.

**बाळू**—पण तुम्ही नीट अभ्यास का करीत नाहीं ?

**वसंत**—अभ्यास का करीत नाहीं? काय सांगूं तुला? वाचलेलें माझ्या डोक्यांतच शिरत नाहीं, मग कसा अभ्यास करणार? छेः बुवा! नको तो अभ्यास. हा भूगोल आपल्याच्यानें नाहीं पाठ करवत बुवा! आग लागो या अभ्यासाला! (जवळच्या आरामखुर्चीवर पडतो.) मी तर आईला सांगणार कीं माझ्याच्यानें अभ्यास करवत नाहीं. हो, सांगणारच. मग ती जें करील तें करील. तिनें मला शाळेंतून काढलें नाहीं, तर कुठें तरी पळून जाईन.

**बाळू**—कुठें पळून जाणार?

**वसंत**—मनाला वाटेल तेथें.

**बाळू**—पण पळून गेल्यावर खाणार काय? राहणार कुठें?

**वसंत**—गाडी हाकीन, मजुरी करीन, नोकरी करीन, काय वाटेल तें काम करीन., पण ही भूगोलाची कटकट नको.

**बाळू**—पण नोकर म्हटला कीं त्याला पहाटेस उठावें लागतें, शेतांत जाऊन मजुरी करावी लागते, अन् कष्टाचीं कामें करावीं लागतात, हें आहे का ठाऊक?

**वसंत**—उंः! त्यांत काय आहे? शेतांत काम करण्यांत तर मौज असते. तुला काय वाटलें कीं मजुरी आणि कष्ट यांचा बागुलबोवा दाखविला कीं मी भिऊन जाईन? तुला माहित नाहीं, उघड्या हवेंत काम करण्याची मला हौस आहे. समजलास? एकच दिवस का होईना? शाळेंत भूगोल शिकून पाहा म्हणजे काय सुख आहे तें कळेल.

**बाळू**—तुम्ही म्हणतां तसें असेल. पण मग शाळेंत भूगोल शिकविण्यांत येतो तो कशासाठीं ?

**वसंत**—मलासुद्धां तेंच कोडें पडलें आहे. हे लोक काय म्हणून भूगोल शिकतात ? पण तें विचारावें कोणीं ? सगळे लोक मुलांना शाळेंत घालतात, तेव्हां आपणहि आपल्या मुलांना शाळेंत घातल्यावांचून कसें चालेल ? जसें कांहीं भूगोलज्ञानावांचून माणसाला जगतांच यायचें नाहीं ! अन् दुनिया अडून राहणार आहे !

**बाळू**—दुनियेचें नाहीं अडून राहणार. पण छोटेसाहेब ! खूप शिकाल तर रावसाहेबांसारखी मोठी नोकरी मिळेल ना ?

**वसंत**—मला अशी नोकरी नकोच असली तर मग ?

**बाळू**—हं ! अशी नोकरी नकोच असली तर !

( कृष्णा आणि वसंताची आई हीं येतात. )

**आई**—( वसंताला ) कां फजीती झाली ना ? आतांच मास्तर तुझ्या संबंधानें गाऱ्हाणें करीत होते. वसंत ! तुझें हें असें वर्तन आतां फार दिवस मी चालूं देणार नाहीं. तुला शिकायचें असलें तर नीट शीक. नाहींपेक्षां शाळा सोड कशी ?

**वसंत**—हो आई ! मी तुला आतां तेंच म्हणणार होतो. माझ्याच्यानें आतां शिकणें होणार नाहीं. मला आतां शाळेंतून काढ. माझ्याच्यानें अभ्यास होत नाहीं.

**आई**—काय झालें न व्हायाला ?

**वसंत**—सांगितलें ना ? माझ्याच्यानें पुस्तकें वाचवत नाहींत, अन् वाचलीं तर वाचलेलें लक्षांत राहत नाहीं. मग काय करायचें ?

**आई**–तर तर ! म्हणे वाचलेलें लक्षांत राहत नाहीं ! पुस्तकाकडे ध्यान ठेवून वाचशील तर ना लक्षांत राहील ? हें पहा, तुला मी पुनः पुनः बजावून सांगत्यें कीं हे वेडेवेडे चार सोडून दे, अन् अभ्यासाकडे नीट लक्ष दे.

**वसंत**—आई ! खरें सांगतों, मला शाळेंतून काढ. मला दुसरें कांहीं नको. बस. हा भूगोल विषय माझ्या मागचा सुटेल तर माझ्यावरचें मोठेंच संकट टळेल. हें गाढवाचें ओझें माझ्याच्यानें आतां सहन करवत नाहीं.

**आई**—पण शिकला नाहींस तर पुढें काय करशील ?

**वसंत**—तें माझें मी आपलें पाहून घेईन.

**आई**—तें पाहण्याचें काम तुझें नाहीं, समजलास ? मुलाला शिक्षण देणें हें आईबापांचें काम असतें. तें त्यांनीं केलें नाहीं तर देवाच्या घरीं तीं गुन्हेगार ठरतील.

**वसंत**–पण माझ्यानें शिकण्याचें काम होत नसलें तर ?

**आई**—काय खुळ्यासारखें बोलतो आहेस ? म्हणे शिकणें होत नसलें तर ? कां नाहीं होत ? हें पहा, तुला अखेरची गोष्ट सांगत्यें. शिकण्याकडे लक्ष दे, नाहीं तर....

**वसंत**—आई ! तुला एकदा सांगितलें ना माझ्याच्यानें शिकणें होत नाहीं म्हणून ? जें व्हायचें असेल तें होईल, पण मी नाहींच शिकायचा.

**आई**—वसंत !

**वसंत**—आई ! माझ्यावर कां उगाच रागावतेस ? (रडतो.) तुला कळत नाहीं.

**आई**—काय म्हटलंस ? मला कळत नाहीं काय ? नीघ येथून, आतांच्या आतां काळें कर. असे शब्द उच्चारायला तुझी जीभ तरी कशी वाहिली ? नीघ येथून.

**वसंत**—हा चाललों. मी कसल्याहि प्रसंगाला भिणारा माणूस नाहीं, अन् मला तुझ्यापाशीं कांहीं मागायचेंहि पण नाहीं. (जातो)

**आई**—काय करावें या पोराला ? कांहीं कळत नाहीं. हा अस्सा मला त्रास देतो. पण या दुःखावरचा इलाज मला ठाऊक आहे. वाचण्याकडे याचें लक्ष लागत नाहीं त्याचाच हा परिणाम. खेळण्याकडचें याचें लक्ष कमी केलें म्हणजे येईल ताळ्यावर.

**कृष्णा**—पण आई ! मुलांनीं खेळायला हवें असें तूंच म्हणत होतीस ना ?

**आई**—हो. पण सारा दिवस खेळतच रहायचें नाहीं. अभ्यासाच्या वेळीं लक्ष लावून अभ्यास करावा, अन् खेळायच्या वेळीं खेळावें.

**कृष्णा**—पण भाऊ म्हणतो कीं त्याच्यानें पुस्तक वाचवत नाहीं, त्याला तो काय करणार ?

**आई**—तो मूर्ख आहे.

**कृष्णा**—पण आळशी होऊन राहावें असें त्याचें तरी कुठें म्हणणें आहे ? त्याला एक भूगोल विषय तेवढा नको आहे. दुसरीं

कामें करण्याची त्याला आवड आहेच. शेतीचें काम, विणकऱ्याचें काम, यासारखीं कामें करण्यास तो खुपी आहे.

**आई**—माझा मुलगा शेतकरी अन् कोष्टी होणार वाटतें ? वा: ! मग कुळाची अब्रू चांगलीच राहील !

**कृष्णा**—पण भाऊचें मन शिकण्याकडे नाहीं, त्याला तो काय करणार ?

**आई**—मन असो नसो. आम्ही वडील माणसें सांगतों तें त्यानें केलेंच पाहिजे.

**कृष्णा**—पण आई ! त्याच्यानें तें होत नसलें तर ?

**आई**—कृष्णा ! तुलाहि त्याच्याच सारखें व्हायचें आहे वाटतें ?

**कृष्णा**—हो, आई ! मलाहि असेंच वाटतें कीं जर आपली शिकण्याची मर्जी नसली तर शिकूं नये.

**आई**—न शिकलास तर ठोंब्या राहशील ना ? मग कोण तुला मुलगी देईल ?

**कृष्णा**—मी मोठा झालों अन् मला मुलेंबाळें झालीं म्हणजे त्यांचेवर मी शिकण्यासाठीं जबरदस्ती करणार नाहीं. त्यांना शिकायचें असेल तर शिकतील; नसलें शिकायचें, तर नाहीं शिकणार. जुलमाचा रामराम हवा आहे कशाला ?

**आई**—(कृष्णाला चिडविण्यासाठीं) तूं मोठा तर हो. मीच तुला तसें करूं देणार नाहीं.

**कृष्णा**—मी तर असेंच करणार.

**आई**—कर तर खरा.

कृष्णा—करीन, करीन, हज्जार वेळां करीन.

आई—तर मग सगळे लोक वेडा म्हणून छीः थू करताल

कृष्णा—बरें आहे............

# वर्तमानपत्र

[ बळवंत ( वय १४ वर्षे ) शाळेंतला धडा करीत आहे. कुसुम (वय ११) लिहीत आहे. इतक्यांत एक मजूर ओझें घेऊन दिवाणखान्यांत येतो. माणून नानू ( वय ८ ) येतो. ]

मजूर—अयायी ! माझी तर पाठच मोडली ! बोला, हें ओझें कोठें ठेवूं ?

बळ०—तुला कोठें ठेवायला सांगितलें होतें ?

मजूर—साहेब येवढेंच म्हणाले कीं दिवाणखान्यांत नेऊन ठेव; मी तुझ्या पाठोपाठ आलोंच.

बळ०—ठीक, तर मग येथें कोपऱ्यांत एका बाजूला तें नीट लावून ठेव.

( बळवंत वाचूं लागतो. मजूर ओझें खालीं ठेवून धापा टाकीत बसतो. )

कुसुम—दादा, या गठ्ठ्यांत काय आहे ?

बळ०—वर्तमानपत्र आहे. याचें नांव ' सत्य. '

नानू—पण ' सत्य ' म्हणजे खरें ना ? ( कोणी ऐकत नाहीं. )

कुसुम—पण वर्तमानपत्रांचा येवढा मोठा गठ्ठा ?

बळ०—हो. सबंध वर्षाचे अंक आहेत ना? (पुनः वाचूं लागतो.)

नानू—हें सगळें इतकें कसें लिहीत असतील?

मजूर—ज्याला हें लिहावें लागलें असेल त्या बिचाऱ्याचे हात लिहितां लिहितां मोडले असतील आणि डोळ्यांच्या खाचा झाल्या असतील.

कुसुम—हें कशावरून म्हणतेस?

मजूर—हें पहाना! किती बारीक अक्षर आहे? आणि इतकें लिहावयाचें तर—

बळ०—वेड्या! तें छापील आहे, छापील! (हसतो.)

कुसुम—(बळवंतास) पण बाबांना या इतक्या वर्तमानपत्रांचें काय करावयाचें आहे?

बळ०—कोण जाणे! एकादा लेख वाचावयाचा असेल.

कुसुम—पण दामूकाका म्हणत होते कीं 'सत्य' पत्रांतले लेख अगदीं रद्दी असतात. ते वाचावेसे वाटत नाहींत.

बळ०—त्यांचें म्हणणें असेंच ना कीं 'सत्य' आपणास आवडत नाहीं, आणि म्हणून आपण 'सत्यप्रकाश' घेत असतों?

नानू—दामूकाकांचें 'सत्यप्रकाश' पत्र पण 'सत्य' एवढेंच आहे?

कुसुम—याच्यापेक्षां तें फारच मोठें आहे. 'सत्य' हें नुकतेंच एक वर्ष झालें निघूं लागलें आहे. 'सत्यप्रकाश' तर आज वीस वर्षें निघत असतें.

नानू—तर मग तें याच्या वीस पटींनीं मोठें असेल नाहीं?

कुसुम—( नानूला चकित करण्याच्या हेतूनें ) अरे, हेंच येवढें काय घेऊन बसलास ? अशीं पंचवीस तीस पत्रें आपल्या देशांत आहेत !

बळ०—( पुस्तकांतून दृष्टि काढून वर न पाहतां ) पंचवीस तीस ? तुला कांहींच ठाऊक नाहीं. पंचवीस तीस काय घेऊन बसली आहेस ? शेंकडों वर्तमानपत्रें एकट्या आपल्या देशांत निघत असतात. इतर देशांतून निघतात तीं निराळींच. तीं सगळीं मिळून हजारों किंबहुना लाखों भरतील.

नानू—त्यांनीं आपलें सगळें घर भरून जाईल, नाहीं ?

बळ०—अरे, घरांत मावणार सुद्धां नाहींत ! आपली सगळी गल्ली भरून जाईल इतकीं वर्तमानपत्रें निघत असतील. पण आतां मला वाचूं दे. उद्यां माझी परीक्षा आहे ना ? अन् तूं तर आपला गप्पा मारीत बसला आहेस ! ( पुनः वाचूं लागतो. )

नानू—पण हे लोक इतकें लिहिण्यांत आपला वेळ कां बरें फुकट खर्च करतात ?

कुसुम—यांत वेळ फुकट कसा खर्च होतो ?

नानू— कां बरें ? वेळ फुकट खर्च होत नाहीं, तर काय म्हणायचें ? कारण, ते जें लिहितात तें सत्य असलें, तर तें पुनः सांगण्याची काय जरूरी आहे ? अन् जर खोटें असलें तर तें मुळीं लिहिण्याचेंच कारण नाहीं.

कुसुम—वाः !

नानू—मग हे लोक कशाकरितां येवढे ढीगभर लेख लिहीत असतील ?

**बळ०**—इतकें वाचलें नाहीं, तर 'सत्य' काय तें कसें समजणार ?

**नानू**—बाबा म्हणत असतात कीं 'सत्य' पत्रांत खऱ्या खऱ्या गोष्टी लिहिल्या असतात. पण दामूकाकांना 'सत्य' पत्र वाचणें आवडत नाहीं. ते म्हणतात कीं 'सत्यप्रकाश' पत्रांत लिहिलें असतें तेंच खरें. मग कोणतें सत्य तें कसें कळणार ? 'सत्य' आणि 'सत्यप्रकाश' या दोघांचाहि अर्थ एकच ना ?

**कुसुम**—नानू म्हणतो तें मला पटतें. इतकीं वर्तमानपत्रें आणि मासिकें आपणांला कशाला हवींत ?

**बळ०**—कुसुम तूं सुद्धां कशी बेअकली आहेस ! अगदीं वेड्यासारखें बोलत्येस.

**कुसुम**—माझें म्हणणें असें कीं इतकें ढीगभर वाचून माणसाचें डोकें गोंधळून जात असलें पाहिजे.

**बळ०**—पण प्रत्येकाला कांहीं नवीन विचार सांगावयाचा असतो ना ? परमेश्वरानें सर्वांनाच बुद्धि दिली आहे. तेव्हां एखाद्याला तरी एखादे वेळीं सत्याचा शोध लागतो.

**नानू**—पण सगळ्यांना बुद्धि असेल तर सर्वांनीं स्वतःसाठीं सत्याचा शोध कां लावूं नये ?

**बळ०**—ओहो ! वाहवारे तुझी अक्कल ! तूं तर झटदिशीं सगळ्या भानगडीचा निकाल लावून टाकिलास ! खरें ना ? पण आतां मेहेरबानी करून शेजारच्या खोलींत जाऊन खेळत बैस अन् मला वाचूं दे. नाहीं तर मी नापास होईन एखादा !

# कला



[राधाबाई आणि बाळू गडी; शशिकला (शाळेंत शिकणारी एक मुलगी)' शाळेची वेळ होत आली आहे. आनंद इंदूला घेऊन शाळेला जाण्यासाठीं शशीच्या घरीं जातो.]

राधा०—काय ? आत्तांच उठलीस वाटतें ?

आनंद—काल रात्रीं नाटकाला गेली होती. त्यामुळें उठायला थोडा उशीर झाला.

राधा०—नाटकाहून घरीं यायला बराच उशीर झाला असेल.

बाळू—नाटक संपायला नेहमीं असा उशीर होतोच.

राधा०—वीरसेनाचें काम करणाऱ्या पात्राचें काम फार चांगलें झालें होतें म्हणतात. तें खरें कां ?

आनंद—कोण म्हणतें ? ज्यांत कांहीं अर्थच नाहीं अशा रागाला मुळीं गाणेंच म्हणतां येत नाहीं. आणखी नाटकांत लढाई, अन् आरडाओरड यांच्याशिवाय दुसरें कांहींच नाहीं. मला तर नाटक मुळींच आवडलें नाहीं.

शशि०—तरी पण नाटकाला प्रेक्षकांची खूप गर्दी असते.

राधा०—मग उत्पन्नहि चांगलेंच होत असेल ?

आनंद—हो. पाहाना ? कालच एक हजार रुपये मिळाले असतील !

बाळू—एक हजार रुपये ? अबबब ! हे येवढे पैसे कोणाला मिळतात ?

आनंद—कोणाला म्हणजे ? नाटक करणारांना. नाटकांत कामें करणारांना चांगला पगार देतात. एका नटाला तर दरमहा दीड-हजार रुपये पगार आहे म्हणून ऐकतो !

बाळू—अबब ! हजार रुपये ? माझ्या सारख्यानें सारा जन्म कष्ट केले तरी त्याला हजार रुपये नुसते पाहायला सुद्धां मिळायचे नाहींत !

( ६ व्या यत्तेतली नलिनी येते. )

नलिनी—राधा घरीं आहे काय ?

राधा०—हो. नलिनी ! ये. आम्ही तुझीच वाट पाहत होतों.

नलिनी—हजार रुपयांच्या कसल्या गोष्टी चालल्या होत्या ?

राधा०—हा आनंद काल नाटक पहायला गेला होता. तो सांगतो कीं एकेका नटाला हजार हजार रुपये पगार आहे. बाळूला तें खरें वाटत नाहीं. इतका मोठा पगार कोणी देत असेल ? तुला याविषयीं कांहीं माहिती आहे ?

नलिनी—अं: ! यांत काय विशेष आहे ? दुसऱ्या देशांतून तर याहून मोठाले पगार नटांना मिळतात. एकदा एका गवै-य्याला गाण्यासाठीं मुद्दाम युरोपांतून अमेरिकेस बोलावून नेलें होतें. त्याबद्दल त्याला एक लाख रुपये मिळाले ! इथल्या सारखे नट तेथें हजारों आहेत. कालच दामूकाकांनीं एका वर्तमानपत्रांत

वाचलें कीं एका माणसाच्या नुसत्या बोटाच्या नखाचें पंचवीस हजार रुपये उत्पन्न झालें !

**राधा०**—हें सगळें खरें असेल काय ?

**बाळू**—वर्तमानपत्रांत सगळ्या गप्पा भरलेल्या असतात !

**नलिनी**—जें वर्तमानपत्रांत छापिलें होतें तें मीं सांगितलें. तुम्हांला तें खरें मानावयाचें असलें तर माना, नाहीं तर राहिलें.

**बाळू**—पण नखाचे पंचवीस हजार देणार कोण ?

**नलिनी**—त्या माणसाच्या बोटांचा विमा उतरलेला होता. त्याच्या नखाला इजा झाल्यामुळें त्याला पियानो वाजवितां येईना. त्यामुळें त्याचें नुकसान झालें. त्या नुकसानीबद्दल भरपाई म्हणून पंचवीस हजार रुपये मिळाले !

**बाळू**—भलतेंच कांहीं तरी ! असें कधीं झालें आहे ?

[इतक्यांत जवळच्या खोलींतून कॉलेजचा एक विद्यार्थी शंभूराव हा येतो]

**शंभू०**—तुम्ही लोक अजून गेला नाहीं काय ? येथें काय करीत आहां ?

[ राधा त्याला सगळी इत्थंभूत हकीकत सांगते ]

**शंभू०**—ही नखाची गोष्ट तर कांहींच नाहीं. पॅरिसमध्यें एका नर्तकीनें आपल्या पायाचा विमा दोन लाखांना उतरला आहे. तिच्या पायाला कांहीं इजा झाली आणि तिला नाचतां न आलें तर नुकसानीबद्दल तिला दोन लाख रुपये मिळणार आहेत !

**बाळू**—असल्या हलक्या सलक्या गोष्टीच्या पायीं इतका पैसा लोक कसे खर्चतात याचें नवल वाटतें.

**शंभू०**—पण हे लोक जसें काम करतात, तसें काम साऱ्या जगांत दुसऱ्या कोणाला करतां येत नाहीं. त्याची सारी किंमत आहे. दुसरें काय ?

**बाळू**—याला तुम्ही ‘ काम ’ म्हणतां ?

**नलिनी**—हो. काम नाहीं तर काय ? तें शिकण्याला त्यांना किती वर्षें अभ्यास करावा लागला असेल याचा कांहीं विचार ?

**आनंद**—पण हीं कामें अगोदर शिकावींच कशाला ?

**बाळू**—नाच आणि गाणें यांच्यापासून कोणता फायदा आहे ?

**शंभू०**—तूं तर एक अडाणीच मनुष्य दिसतोस ! कला ही किती उच्च प्रतीची आहे याची जाणीव तुला कोठून असणार ?

**बाळू**—मला येवढें कळतें कीं असल्या रिकाम्या कामासाठीं लाखों रुपयांचा चुराडा करणें हा शुद्ध मूर्खपणा आहे. आम्ही मिळवितों त्याप्रमाणें निढळाच्या घामानेंच पैसा मिळता, तर दुनियेंत असे गवय्ये आणि नर्तकी निघाल्याच नसत्या.

**शंभू०**—तुम्हां लोकांना कांहींच ठाऊक नाहीं. तुमच्या दृष्टीनें रविवर्मा आणि गौहरजान म्हणजे शुद्ध रिकामटेकडे होत. असेंच कीं नाहीं ?

**नलिनी**—आम्हांलाहि आतां असें वाटूं लागलें आहे कीं हा बाळू म्हणतो तेंच खरें.

**आनंद**—चला. आपण अशा गप्पा मारीत राहिलों तर शाळेची घंटा सुद्धां वाजून जाईल अन् तुम्हांला उशीर होईल.

( मुलें शाळेस जातात. )

# विज्ञान

[ नरहरी (वय १५ वर्षें) विनायक (१६), बाबू (८), यशवंत (६) ]

**नर०**—संस्कृत साहित्यांत जें सरस व मूल्यवान् आहे त्याचें भाषांतर मिळूं शकतें. मग अशी कठिण भाषा शिकण्याची माथेफोड कशाला करा ?

**विना०**—रामायण, शाकुंतल वगैरे ग्रंथांची खरी खुबी तर मूळ ग्रंथ वाचल्यानेंच समजते. भाषांतर कितीहि चांगलें असलें, तरी अखेर भाषांतर तें भाषांतरच !

**नर०**—पण समजा, कीं एखाद्याला ते ग्रंथ वाचायचेच नसले तर ? माझेंच उदाहरण घ्या. मला रामायण वाचावयाची थोडी सुद्धां हौस वाटत नाहीं.

**यशवंत**—रामायण म्हणजे काय ?

**नर०**—ती एक गोष्ट आहे.

**विनायक**—तसें पाहिलें तर या साऱ्या दुनियेंत रामायणासारख्या कितीतरी गोष्टी आहेत !

**बाबू**—पण रामायणांत येवढें काय भरलें आहे ?

**नर०**—कांहीं नाहीं. मीं सांगितलें ना ? दुसऱ्या गोष्टीसारखी तीहि एक गोष्ट आहे झालें.

**विना०**—हो. पण रामायण नुसती गोष्ट असली, तरी ती वाचल्यावांचून तुम्हांला पूर्वींच्या काळाविषयींचें खरें ज्ञान कधीं होणार नाहीं.

**नर०**—माझी समजूत अशी आहे कीं जसा धर्म तसेंच पूर्वीच्या काळचें ज्ञान हें अतिशय शंकास्पद आणि केवळ कल्पनेचे तरंग आहे.

**विना०**—( रागावून ) धर्मांत एक वेळ खोटेपणा आणि विचित्रता चालूं शकेल. पण रामायण हा प्राचीन काळचा इतिहास आहे. यांत साऱ्या दुनियेंतलें शहाणपण भरलें आहे.

**बाबू**—धर्म म्हणजे खोट्यानाट्या गोष्टी काय ?

**विना०**—तुला नाहीं तें कळणार. पण तूं येथें काय करीत आहेस ? बाहेर जा.

**यश०**—एखादे वेळीं तुम्हांला समजणार नाहीं तें कदाचित् आम्हांला समजेल.

**विना०**—बरें तर. एका बाजूला मुकाट्यानें बसा, अन् आम्हांला बोलूं द्या. ( नरहरीला ) तुझें असें म्हणणें आहेना कीं प्राचीन काळच्या भाषांचा आपल्या जीवनाशीं कांहीं संबंध नाहीं ? पण मग तुमच्या त्या खगोल, रसायन, आणि जंतुशास्त्र यांच्या संबंधानें सुद्धां असेंच म्हणतां येईल. आकाशांतले ग्रह, त्यांचा विस्तार, आणि त्यांच्या मधलीं अंतरें असल्या निरुपयोगी गोष्टींचें ज्ञान करून घेण्यापासून आपणांस कोणता लाभ होणार आहे ?

**नर०**—शास्त्रज्ञानासारख्या गोष्टींना तूं निरुपयोगी म्हणतोस ?



मुलांचें

**विना०**—हो. उदाहरणार्थ–खगोल अथवा ज्योतिषशास्त्र घे. त्याचा जीवनाला काय उपयोग आहे ?

**नर०**—कां बरें ? पुष्कळ आहे. नुसत्या खलाशांना म्हटलें तरी त्याची केवढी आवश्यकता आहे !

**विना०**—पण आपले खलाशी कुठें गेले होते खगोल शिकायला ?

**नर०**—याशिवाय शेतकी, वैद्यक, व्यापार इत्यादि गोष्टींतहि शास्त्रज्ञानाचा व्यावहारिक उपयोग होऊं शकतो.

**विना**——होय; अन् युद्धाच्या वेळीं दारूगोळा वगैरे बनविण्याच्या कामींहि त्याचा उपयोग होतो; हें खरेंना ? अशा ज्ञानानें जर लोकांची सुधारणा होती, तर——

**नर०**—पण तुमच्या संस्कृताच्या ज्ञानानें तरी ती कुठें होते ?

**बाबू**—तर मग कोणत्या ज्ञानानें सुधारणा होऊं शकेल ?

**विना०**—बाबू ! तुला एकदा सांगितलेंना कीं आम्ही बोलत असलों कीं तूं मध्यें तोंड घालूं नकोस म्हणून ? दर वेळेस पाहावें तर तूं आपलें अकलेचे तारे तोडतोस आणि मूर्खासारखें कांहीं तरी बोलतोस !

**बाबू**—मूर्खासारखे म्हणा कीं शहाण्यासारखे म्हणा; पण जरा समजावून तर द्याल ? कोणत्या प्रकारच्या ज्ञानानें लोकांची सुधारणा होईल ?

**नर०**—असें कोणतेंच ज्ञान किंवा शास्त्र दाखवितां येत नाहीं. आपल्या जीवनाची सुधारणा ही ज्याची त्यानें स्वतःच्या अकलेनेंच केली पाहिजे.

**विना०**—तूं यांच्याशीं रिकामी माथाफोड कां करतो आहेस ? यांची या गोष्टींत कधीं समजूत पडायची नाहीं.

**नर०**—शास्त्राच्या गोष्टी तुमच्या काय कामाच्या ?

**बाबू०**—असें आहे तर त्या शास्त्रांची जरूरच काय मुळीं ?

**यश०**—मी मोठा होईन तेव्हां ज्यांची जरूरी नाहीं अशा गोष्टी शिकणारच नाहीं.

**बाबू**—बरोबर. मी पण ज्यानें अधिक चांगल्या रीतीनें राहतां येईल तेंच शिकेन.

**विना०**—( हसतो ) पाहिले हे अकलेचे पुतळे !

# मुळें

[ बाईसाहेब, सीताराम ( १५ वर्षे) व जान्हवी ( ७ वर्षे ) बसलीं आहेत. इतक्यांत एक गरीब म्हातारी येते ]

**बाईसाहेब**—कोणीकडे आलीस, म्हातारे ?

**म्हातारी**—बाईसाहेब ! घटकोघटकी आपल्याकडे यायला मला शरम वाटते. पण—

**बाई०**—पण काय ? सांग तर खरी काय सांगायचें तें ?

**म्हातारी**—काय सांगूं बाईसाहेब ? माझी मुलगी बाळंतीण झाली आहे, अन् तिचें बाळंतपण करायला माझ्याजवळ तर पैसा नाहीं.



मुलांचें

**बाई०**—पण तुझ्या मुलीचें नुकतेंच गतवर्षी ना बाळंतपण झालें होतें ?

**म्हातारी** — हो, बाईसाहेब. मागच्या कार्तिकांत तिला मुलगी झाली होती.

**बाई०**—तुझ्यां घरांत एकंदर मुलें तरी किती झालीं आहेत ?

**म्हातारी**—तें कांहीं विचारूं नका बाईसाहेब ! मोजवणार नाहींत इतकीं आहेत ! कोणी घ्यायला तयार असला तर यांतली अर्धीं मी खुषीनें देऊन टाकीन.

**बाई०**—म्हातारे ! तुझ्या मुलीला किती मुलें झालीं ?

**म्हातारी**—सात. अन् तीं सगळीं हयात आहेत. त्यांतलीं थोडीशीं देवानें परत नेलीं तर बरें होईल.

**बाई०**—म्हातारे ! असें बोलूं नये.

**म्हातारी**—बोलूं नको तर काय करूं ? माझ्यापाशीं तर फुटकी कवडीसुद्धां नाहीं. मुलें लहान लहान कच्चीं बच्चीं आहेत. अन् यांना सोडून जावईबुवा नोकरीवर गेले आहेत. बरें, ते खर्चालाहि कांहीं धाडीत नाहींत. बाईसाहेब ! मी तर आतां म्हातारी झाल्यें आहें अन् या मुलीचीं पाहावीं तर अशीं बाळंतपणावर बाळंतपणें ! अशानें तिला घरांतलीं कामें करायला शक्ति कोठून राहणार ? सगळीं कामें माझ्यावर येऊन पडतात. मुलें तर सगळ्या दिवसभर खायला मागत असतात.बाईसाहेब! माझ्यावर थोडी दया करा.

**बाई०**—तूं सांगत्येस तें सगळें खरें ना पण ? तुझ्या मुलीला सात लेकरें आहेत ?

**म्हातारी**—होय, बाईसाहेब. खोटें कशाला बोलूं? सर्वांत मोठी मुलगी आठ वर्सांची झाली आहे. तिची थोडीशी मदत होते. बाकीचीं मुलें लहान लहान आहेत.

**बाई०**—पण म्हातारे! तुझ्याच घरीं इतकीं मुलें कां असावीं?

**म्हातारी**—बाईसाहेब! ती काय आपल्या स्वाधीनची गोष्ट आहे? माझा जांवई दहाबारा महिन्यांनीं एकदा नोकरीवरून रजा घेऊन येतो. अन् .... आतां त्याची बदली खूप दूर होईल तर बरं होईल.

**बाई०**—पुष्कळांना मुलें होत नाहींत; अन् झालीं तरी वांचत नाहींत, म्हणून ते रडतात. अन् तुला पाहिजेत त्यापेक्षां पुष्कळ अधिक नातवंडें आहेत म्हणून तूं रडत्येस! परमेश्वराच्या घरचा हा काय चमत्कार आहे पहा!

**म्हातारी**—बाईसाहेब! घरांत पोरांचा इतका भरणा झाला आहे कीं त्यांना खायला काय घालूं याचीच फिकीर मला येऊन पडली आहे! माझ्यावर कांहीं दया करा हो.

**बाई**—( पेटींतून दहा रुपयांची नोट आणून देत्ये. ) हे घे पैसे. पण पुनः मागायला आलीस तर खबरदार!

**म्हातारी**—ईश्वर तुमचें कल्याण करील.

(म्हातारी जाते.)

**जान्हवी**—आई! कोणाला मुलें होतात, अन् कोणाला होत नाहींत, हें कसें? तुला मुलें आहेत; काकूला आहेत तशी शारदाताईला कां नाहींत?

बाई०—शारदेचें लग्न अजून व्हायचें आहे.

जान्हवी—लग्न झाल्यावांचून मुलें होत नाहींत तर मग?

बाई०—नाहीं. लग्न झाल्यावरच होतात.

जान्हवी—सगळ्यांना होतात?

बाई०—नाहीं. कित्येकांचें लग्न झालें असूनहि त्यांना होत नाहींत.

जान्हवी—ज्यांना मुलें हवीं असतील त्यांना व्हावीं, अन् ज्यांना नको असतील त्यांना होऊं नयेत, अशी व्यवस्था होऊं शकते काय?

सीता०—काय वेडी आहे पोर!

जान्हवी—कोण वेडी? मी? वेडी कशी सांग? मी म्हणत्यें तें कां खोटें? हेंच पहाना? या म्हातारीच्या मुलीला इतकीं पुष्कळ मुलें झालीं आहेत कीं तिला अगदीं नको नकोसें झालें आहे. आतां पुढें मुलें होणार नाहींत असें करतां आलें तर चांगलें नाहीं का होणार?

सीता०—जान्हवी! तुला अगदीं कळत नाहीं. कांहीं तरी वेड्यासारखें बोलत्येस, झालें.

जान्हवी—आई! तूंच सांग मी म्हणत्यें तसें नाहीं का करतां येणार?

बाई०—देव देतो तितकीं मुलें होतात.

जान्हवी—पण आई! मुलें कशीं होतात?



म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय
दा. क्र. २९५
दि. ..........
IRBK-0102958
IRBK-010295

सीता०—आकाशांतून देवता खालीं उतरतात अन् मुलांना येथें ठेवून जातात. [ हसतो. ]

जान्हवी—(चिडून) पण यांत हसण्यासारखें काय आहे ? आई ! मला असें वाटतें कीं म्हातारीच्या घरीं जर खायला नाहीं, तर तिच्या घरीं यापुढें मुलें होऊंच नयेत. [ घरांतली मोलकरीण काशी येते. तिला पाहून ] या काशीला मूलबाळ कां नाहीं ?

बाई०—तिचें लग्न अजून झालेलें नाहीं.

जान्हवी—बस तर. ज्यांना मुलें आवडत नसतील त्यांनीं काशी-सारखे लग्न न करतांच राहावें.

( बाईसाहेब आणि सीताराम काशीकडे पाहून हसतात. काशी रागानें डोळे बटारीत चालती होते. ) पहाना ? लेकरामागून लेकरें होत आहेत आणि त्यांना खायलासुद्धां मिळत नाहीं !

(बाईसाहेब आणि सीताराम एकमेकाकडे पाहत मुकाट्यानें उभे रहातात.)

जान्हवी—मी मोठी झाल्यावर लग्न करीन. पण देवाला सांगेन कीं मला एकच मुलगा आणि एकच मुलगी दे. बस. याहून ज्यास्त नकोत. कारण कीं, मुलें झालीं म्हणजे त्यांच्याविषयीं प्रेम वाटायचेंच. नाहीं असें कसें होईल ? मी आपल्या लेकरांवर खूप प्रेम करीन आई ! खरं कीं नाहीं ?

( खुर्चीवर पडलेली भावली हातांत घेऊन खेळण्यासाठीं बाहेर जाते. )

बाई०—मुलांपासून मोठ्या माणसांनीं शिकण्यासारख्या किती तरी गोष्टी आहेत ! ही जान्हवी म्हणते तें सगळें खरें आहे. मागचा पुढचा विचार न करतां लोक लग्नें कां करतात ? आई-



मुलांचें